४४

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय ना. वा
दा. क्र. ४४

BVBK-0400044

कि.

बो. वा.

नों. क्र. ४४

म. ग्रं. सं. [illegible]

[illegible] ४४

विषय किशोर [illegible] २३

BVBK-0400044

४४
किशोर 23

कथाकल्पलता

# सत्वधीर

लेखक
पं. महादेवशास्त्री जोशी

जोशी ब्रदर्स बुकसेलर्स ॲण्ड पब्लिशर्स
अप्पा बळवंत चौक, पुणे २

पाच रुपये

प्रकाशक :

केशव वामन जोशी
जोशी ब्रदर्स
२५ बुधवार पेठ,
अप्पा बळवंत चौक, पुणे २

अंतर्गत सजावट
भय्यासाहेब ओंकार

मुखपृष्ठ
दीनानाथ दलाल

मुद्रक :

सु. प. बर्वे
परशुराम प्रोसेस
१६ अ, शिवाजीनगर
पुणे ५

या पुस्तकास वापरलेला कागद सवलतीच्या दराने मिळालेला आहे. त्याबद्दल महाराष्ट्र राज्य कागद वाटप समितीचे आम्ही आभारी आहोत.

—प्रकाशक

## प्रस्तावना

कथाकल्पलतेचें हें दहावें पुष्प. यांत पांच गोष्टींचा समावेश आहे. भारताच्या वेगवेगळ्या प्रदेशांत सांगितल्या-ऐकल्या जाणाऱ्या या गोष्टी आहेत. भारताच्या सांस्कृतिक परंपरेची पार्श्वभूमि या सगळ्या गोष्टींना लाभलेली आहे. या पुस्तकाला 'सत्त्वधीर' हें नांव मीं हेतुपूर्वक योजलें आहे. या सर्व गोष्टींतून प्रत्ययाला येतें तें भारतीय अंतःकरणांतलें सत्त्व. आपत्तींना न जुमानणारें आणि मोहाला बळी न पडणारें वज्रकठोर सत्त्व !

पहिलीच 'गृहलक्ष्मी' ही गोष्ट घ्या. तिच्यांतली अन्नपूर्णा मोडलेला संसार स्वतःच्या शहाण्या निर्धारानें पुनश्च उभा करते अन् शेवटीं कुटुंबाच्या नांदणुकीसाठींच आत्मार्पण करून मोकळी होते. चवथ्या गोष्टींतल्या चारणकन्येचीहि सत्त्वनिष्ठा तितकीच प्रबळ. ती सती आहे, नारीधर्माचा आदर्श आहे; पण त्याचबरोबर स्वाभिमान राखणारी आहे. तिचा आत्मत्याग रडवा नाहीं. इहलोकीं साधलें नाहीं तें परलोकीं तरी साधीनच; ही बळकट श्रद्धा तिच्या हृदयांत आहे.

'अपराध आणि शिक्षा' या कथेचा नायक खऱ्या अर्थानें नरवीर आहे. श्रियाळ, हरिश्चंद्र यांचा आत्मा त्याच्या हृदयांत गुंजारव करीत आहे. सूड घेण्यापेक्षांहि क्षमा करणें किती

कठीण असतें आणि शेवटीं तेंच किती उदात्त असतें, तें समजायला ती गोष्ट उपकारक ठरेल. ' कर्पूर चौहान ' तर कुलाच्या कीर्तीसाठीं आणि क्षात्रधर्म जाणवण्यासाठीं दंड थोपटून सामन्याला उभा राहिला आहे. मरणालाहि मारणाऱ्या छत्रपति संभाजीचा तो पूर्वावतार वाटतो. आणि शेवटचा तो चक्रवेण ! राजा असूनहि श्रमांची, स्वावलंबनाची प्रतिष्ठा राखणारा, त्यागमय जीवनांत सकल विलासांचा सुखानुभव घेणारा, तो केवळ राजाच नाहीं तर समाजाला आदर्श घालून देणारा व जें उपदेशायचें तें स्वत: जगून दाखवणारा महापुरुष आहे.

अशीं हीं नर-नारीरत्नें मीं या पुस्तकांत एकत्र आणलीं आहेत. तत्त्वज्ञान आणि धर्मशास्त्र यांच्यापेक्षांहि अशा कथा यांनींच आजवर भारतांतल्या समस्त जनतेला खऱ्या जीवनाचें शिक्षण शत-सहस्रकांच्या परंपरेनें दिलें आहे. भारत अमर व्हायला हवा असेल, तर अशा कथा अमर रहायला हव्या... आणि त्या रहातीलहि.

या मालेच्या इतर पुस्तकांप्रमाणें हेंहि पुस्तक विद्यार्थिवर्गाच्या अभिरुचीला मानवो ही आकांक्षा.

पुणें – कोजागिरी,
शके १८८०

—महादेवशास्त्री जोशी

# गृहलक्ष्मी

कालचक्र सदैव फिरत असतें. त्या फेरींत जिथें प्रवाह असतो तिथें वाळवंट बनतें. निबिड अरण्य असतें, तिथें वैराण मैदान होतें. प्याद्याचे फर्जी होतात. रंकाचे राव होतात आणि रावाचे रंक बनतात. कोंकण वस्तींतल्या एका सावकार घराण्याचेंहि तसेंच झालें.

सावकार मोठा धनंतर होता. कित्येक पिढ्या त्याच्या घरांत लक्ष्मी नांदत होती. घरांत भाताचे तट्टे भरून ओसंडत होते. दुधाचे हंडे भरत होते. दह्याचे डेरे घुमत होते. घरांत अत्तराचे दिवे जळत होते. दारीं पालख्या – मेणे उतरत होते. येत्या – जात्याची वर्दळ अखंड चालू होती. दुपारच्या वेळीं पडवीवर येईल त्याला ग्रासभर अन्न प्रेमानें मिळत होतें. दानधर्म अविच्छिन्न चालत होता. त्या रूपानें बाहेर गेलेलें धन दुसऱ्या रूपानें परत घरीं येत होतें. घरांतल्या बायका सोन्यानें मढलेल्या होत्या. मुलांच्या अंगावरहि सुवर्णलक्ष्मी विराजत होती.

पण एक दिवस सावकार मरण पावला आणि दौलतीचा धारणच उन्मळून पडल्यासारखें झालें. सावकाराला तीन मुलगे होते. सगळे वयांत आलेले होते. सगळ्यांचीं लग्नकार्यें झालेलीं होतीं. पण बापाच्या पाठीमागून दौलतीचा डोलारा सांभाळून धरण्याची

कुवत एकांतहि नव्हती. सगळे बेटे व्यसनी आणि ऐतखाऊ. कोणी तसूभरसुद्धा जोडून आणायचा नाहीं. घरांत असेल तें मोडायला मात्र प्रत्येकाचा हात सदैव पुढें. सर्वांची जीभ चवचाल. सकाळीं उठल्यावर आज कोणता पदार्थ खायचा, हाच प्रत्येकाचा विचार. प्रत्येक जण दिवसभर आपल्या खोलींत लोळत पडायचा. लोळून कंटाळा आला कीं गांवांत भटकायला जायचा. उद्योगाच्या नावानें वषट्कार ! प्रत्येकाला नानापरीचे छंदफंद. त्यासाठीं नित्य धनाचा अपव्यय. असेल तें उधळणें आणि मौज करणें, हाच प्रत्येकाचा बाणा. तिघांचीं तोंडें तीन दिशांना. एकत्र बसून संसाराचा विचार करण्याचें नांवच नको.

त्यामुळे सांचलेलें तळें थोड्याच दिवसांत आटलें. शिलकींतलें धन संपलें; पण त्यांचे छंद मात्र संपले नाहींत. प्रथम घरांतल्या बायका लंकेच्या पार्वती बनल्या. दर महिन्याला एकेकीच्या अंगावरचा एकेक बिनलाखी वजनदार नग अदृश्य होऊं लागला. मग ठिकाणें भाटें दुसऱ्या सावकारांच्या घरीं गहाण पडलीं. व्याजाच्या रकमा फुगून देणीं दामदुप्पट होऊं लागलीं. शेताचे तुकडे एका मागून एक दुसऱ्याच्या मालकीचे होऊं लागले. कुळागरांतली सुपारी दुसऱ्याच्या अंगणांत जाऊन पडूं लागली. शेतांतलें भात दुसऱ्याच्या घरच्या कणग्या भरूं लागलें.

शेवटीं सगळें गेलें. हरिश्चंद्राप्रमाणें बायकामुलें विकायचीं तेवढींच बाकी राहिलीं. एवढा मोठा चौसोपी वाडा; पण घरांत गडी मोलकरीण न उरल्यामुळें त्यांतला केरहि निघेनासा झाला.

झाड-सारव थांबली. पावसाळ्याच्या प्रारंभीं त्याची धड शाकारणी सुद्धा होईना. त्यामुळें घरांत सगळीकडे गळती सुरू झाली. पावसाच्या माऱ्यानें घराचे कोनेकोपरे ढासळूं लागले. सगळ्या घराला आणि मुला-माणसांनासुद्धा अवकळा आली.

बाजारांतील पत गेली. दुकानदार एका पैचाहि माल उधार देईना. पुरुष बाजारांत गेले, कीं जो भेटेल तो तोंड चुकवूं लागला. घरांतलें धान्य संपलें. गुरेंढोरें केव्हांच पसार झालीं. सर्व बाजूनीं नाड्या आंखडल्या. सगळीकडे अंधार पसरला. महिन्याची प्रत्येक तिथि एकादशी ठरूं लागली. मुलें अन्नासाठीं रडूं भेकूं लागलीं. बायका केवळ पोटाला आटल्या. त्यांच्या अंगावरचा 'कापूस' पार झडला. घरांत आदळ आपट सुरू झाली. भांडणांना ऊत आला. प्रत्येक जण वैतागून दुसऱ्याच्या अंगावर खसवसूं लागला. लक्ष्मी गेली, शांति गेली आणि घरांत 'आक्काबाई' फुगडी घालूं लागली.

इतके होऊनहि घरांतल्या त्या पुरुषांना कांहींतरी उद्योग करावा असें कधींच वाटलें नाहीं. मात्र थोरल्या भावाला एक कल्पना सुचली. पण ती उद्योगाची नव्हे; तर त्याहून विपरीत. महाभयंकर! तो एक दिवस बाजारांत गेला अन् कसल्या तरी वस्तूची पुडी विकत घेऊन घरीं आला. त्यानें आपले भाऊ, घरांतल्या सगळ्या बायका, सगळीं मुलें, या सर्वांना एकत्र बोलावलें. सर्वांना आपल्या भोंवतीं बसवून घेतलें. मग ती पुडी सोडून पेलाभर पाण्यांत कालवली. त्याची बायको अन्नपूर्णा. तिनें तें कृत्य पाहिलें. तिला तें भयंकर वाटलें.-तिनें दचकल्या मनानें नवऱ्याला विचारलें. 'हे काय?'

त्यावर तो म्हणाला.

"हें मृत्युदेवाचं तीर्थ आहे. स्वच्छ शब्दांत सांगायचं, तर हें जालीम विष आहे. सगळ्यांनीं पळी पळी प्यायचं आणि स्वस्थ पडून राह्यचं. थोडा वेळ अंगाचा भडका! थोडा वेळ तळमळ! मग सगळं शांत होईल! ... आतां जगण्याची परिस्थिति उरलेली नाहीं. आतां या अगतिक यातनांतून सुटायला एकच उपाय—कौटुंबिक-मरण!"

तें ऐकून अन्नपूर्णेला फार दुःख झालें. ती बाई शहाणी, विचारी होती. आपलें घर दिवसेंदिवस धुतलें जात आहे आणि अखेर एक दिवस तें धुतलें गेलें, याची तिला विशेष खंत होती. तिनें आपल्या नवऱ्याला अन् दिराला 'कांहींतरी करा रे साधन' म्हणून अनेकदा विनवलें होतें. पण कोणींच तिचें ऐकलें नव्हतें. इतकें होऊनहि तीच एकटी त्या घरांत शांत होती. आपल्या दोन हातांनीं जितके काबाडकष्ट करतां येतील, तितके करीत होती. तीच एकटी भवितव्याची विवंचना अहोरात्र करीत होती.

आतां जेव्हां नवऱ्यानें सर्वांसाठीं पाण्यांत विष कालवलेलें तिनें पाहिलें, तेव्हा मात्र तिच्या खंगलेल्या देहावर कांटा उभा राहिला. ती त्या सर्व पुरुषांना उद्देशून म्हणाली.

"थांबा! कोणीहि या वस्तूला हात लावूं नका. आजवर जो अविचार केलात तो केलात. आतां त्यावर कळस चढवूं नका. बायकापोरांच्या हत्येचं आणि त्याहिवर आत्महत्येचं घोर पातक आचरूं नका."

तिच्या वाणींत या वेळीं तेज प्रगटलें होतें, तिच्या त्या शब्दांना चांगलीच धार होती. त्या मरण–कोलाहलांत तिचे ते शब्द अगदीं वेगळे होते. त्यामुळें सगळ्यांनीं 'आ' वासून तिच्या मुखावर टक लावली. ती पुढें म्हणाली.

" मरण कोणाला चुकलं नाहीं. योग्य वेळीं काळ प्रत्येकाला घेऊन जातोच. मरण्यांत पुरुषार्थ नाहीं. पुरुषार्थ आहे तो जगण्यांत. आजवर तुम्ही कोणी माझं ऐकलं नाहीं. प्रत्येक वेळीं मला धुत्कारलंत, पण अजूनहि तुम्ही माझं ऐकाल, तर मी तुम्हांला जगवीन. या सोन्यासारख्या मुलांनाहि जगवीन. आणि खचलेलं, ढांसळलेलं, घरदारहि पुनश्च उभं करीन...."

तिचें तें आत्मविश्वासाचें बोलणें ऐकून सगळे प्रभावित झाले. खरोखर त्या वेळीं तिच्या मुद्रेवर कसलें तरी विलक्षण तेज ओसंडत होतें. त्या कालवलेल्या विषाच्या रूपानें मृत्यु सभोंवतीं घेरून आला असतांना, त्यांना ती अन्नपूर्णा म्हणजे जणूं देवताच वाटली. कारण तशाहि परिस्थितींत त्या सर्वांना जगावेंसें वाटत होतें. आणि अन्नपूर्णा वरद-हस्त उभारून त्यांना जगवण्याचें आश्वासन देत होती. त्यामुळें त्या सर्वांनीं एका सुरांत सांगितलें, कीं ' जगायला मिळत असेल, तर आम्ही सगळे तूं सांगशील तें ऐकूं. ' त्यावर अन्नपूर्णा म्हणाली.

" ऐका तर मग. तुम्ही तिघेहि भाऊ कमालीचे ऐदी अन् आळशी झालां आहांत. आळसानं तुमचीं शरीरं आणि मनं पोखरून टाकलीं आहेत. आळसाच्या जोडीला व्यसनं. तुम्ही

कामांतून गेलांत आणि संसाराचा सत्यानास केलात. तेव्हां आळस झाडून टाकायचा ही पहिली गोष्ट."

"मान्य....पुढें काय करायचं?"



तिघेहि भाऊ उद्योगाला लागतात.

"सकाळीं रामपाऱ्यांत उठून बाहेर पडायचं. वाट फुटेल तिकडे जायचं आणि येतांना एखादी वस्तु घेऊन घरीं यायचं. मग ती कोणतीहि असो. कितीहि क्षुद्र असो. मात्र ती कोणाच्या

मालकीची नसावी. चोरीची नसावी.

सर्वांनीं ती गोष्ट मान्य केली. त्या रात्रीं सगळेजण सुखानें झोपले. पोट रिकामें असूनहि सर्वांना गाढ झोप लागली. सकाळीं सर्वांना नव्या आशेची जाग आली. सगळे खडबडून उठले. लगेच घराबाहेर पडले. खूप दूरवर गेले. आजूबाजूला पहात पहात गेले. पण त्यांना घरीं नेण्याजोगें कांहींच सांपडेना. रिकाम्या हातांनीं घरीं परतायचें नाहीं, हा तर अन्नपूर्णेचा सक्त हुकूम होता. आणि जगायचें तर तो त्यांना पाळायलाच हवा होता. म्हणून मग कोणीं दोरीचा तुकडा उचलला. कोणीं एक फ़ळकूट पडलें होतें तें उचललें. कोणीं एक लांकडाचा ओंडकाच डोक्यावर घेतला.

सगळे घामानें निथळत घरीं आले. अन्नपूर्णेला आनंद झाला. आनंद एवढ्याचसाठीं, कीं आज त्यांच्या अंगातून आळस निघून गेला होता. तिनें लगेच चुलीवर आधण टाकलें. त्यांना पातळ पेज शिजवून वाढली. ते चवीनें जेवले. त्या दिवशींची ती पेज त्यांच्या अंगीं लागली. दुसऱ्या दिवशीं ते पुन्हां बाहेर पडले. तिसऱ्या दिवशींहि तसेंच. सगळें करून सवरून भागल्यावर ते आतां अन्नपूर्णेचे आज्ञाधारक बनले. त्यांचा तो नित्यक्रम झाला. रोज रोज वाटेवर काय सांपडणार ! म्हणून मग त्यांनीं डोंगरांतले दगडच उचलून आणायला सुरवात केली.

घराच्या परसांत दगडांची रास जमली. नित्य ती वाढूं लागली. अन्नपूर्णा ते दगड पाहून खुष होऊं लागली. कारण ते दगड ही त्या घरांतल्या पुरुषांच्या उद्योगाची खूण होती. तिघांहि भावांना

आतां तोच छंद लागला. श्रमण्यांतली, उद्योगांतली गोडी त्यांना कळूं लागली. गांवांतले लोक त्यांना रोज दगड आणतांना पाहून हसत होते, कुजबुजत होते. पण त्या भावांनीं आतां त्या बाबतींतली लोकलाज सोडली' होती.

कांहीं कालानंतर कुठल्यातरी परदेशाची एक फतेमारी त्या गांवच्या बंदराला लागली. तिच्यांतला माल बंदरांत उतरला गेला. परत जातांना तिथला कांहींतरी माल भरून घेऊन जायचें. पण फतेमारीच्या मालकाला किफायतशीर असें कांहीं मिळालेंच नाहीं. परंतु फतेमारीला कांहीं तरी भरताड ही हवीच होती. नाहींतर ती वाऱ्यावर हेलकावे खाऊन समुद्रांत भलतीकडे भरकटण्याचा संभव होता. म्हणून तिचा मालक गांवांत हिंडून कांहींतरी भरताड शोधूं लागला.

फिरतां फिरतां अन्नपूर्णेच्या परसांत त्याला बरेच दगड दिसले. त्यानें ते ' विकत देतां का ? ' म्हणून घरांतल्या पुरुषांना विचारलें. ते म्हणाले, कीं ' बाईला विचार ! ' अन्नपूर्णेनें मामुली किंमत घेऊन ते दगड विकले. फतेमारीला भरताड झालें. अन्नपूर्णेला वाटलें, कीं किंमत थोडी असली तरी हातीं आलेलें हें धन पुरुषांच्या उद्योगांतून आलेलें आहे. ही श्रमांची कमाई आहे.

आपल्या देशीं परत पोंचल्यावर फतेमारीच्या मालकानें ते दगड उपसून इतस्ततः फेकून दिले. त्याला त्या दगडांची काय पर्वा होती ! पण ते दगड एका पारखी माणसाला दिसले. त्यानें त्यांतल्या एका दगडावर दुसरा दगड आपटून तो फोडला. त्यांत त्याला सोन्याचे कण आढळले. फतेमारीच्या मालकाला त्यांतलें रहस्य

कळूं न देतां त्या पारखी माणसानें ते सगळे दगड विकत घेतले. फतेमारीवाल्याला त्या दगडांची बरीच किंमत मिळाली. भरताड म्हणून आणलें त्याचा चांगला फायदा झाला. तो माणूस फतेमारी-वाल्याला म्हणाला, कीं 'पुढच्या खेपेस असलेच दगड मिळतील तेवढे आण; मी तुला त्यांची चांगली किंमत देईन.'

पुन्हां त्यानें केवळ दगडांसाठीं फतेमारी आणली. पुन्हां तो गांवांत आला आणि अन्नपूर्णेच्या घरापुढेंच उभा राहिला. त्याच जातीचे किती तरी दगड तिच्या परसांत आणखी त्याला दिसले. पुढें येऊन त्यानें अन्नपूर्णेला अदबीनें नमस्कार केला आणि ते दगड मागितले. 'मागच्यापेक्षां थोडी अधिक किंमत देईन' असेंहि तो म्हणाला.




अन्नपूर्णा दगडांचा सौदा करते

अन्नपूर्णा तेवढ्यावर चत्रावली. तिला वाटलें, कीं या दगडांत कांहींतरी मूल्यवान् आहे. तिनें त्यांची चौपट किंमत सांगितली

आणि फतेमारीवाल्यानें आढेवेढे घेत का होईना; ती तिच्या पदरांत घातली. तो फतेमारीवाला ती खेप टाकून पुन्हां त्याच दगडांसाठीं आला. मग अन्नपूर्णेचा आणि त्याचा करारच ठरला. अन्नपूर्णेच्या घरांतल्या पुरुषांनीं हिरीरीनें दगड आणायला सुरवात केली. फतेमारीवाला त्या दगडांसाठीं सारख्या खेपा करूं लागला. या व्यवहारांत अन्नपूर्णेला अमाप द्रव्य मिळालें.

मग तिनें गहाण पडलेलीं ठिकाणें भाटें प्रथम सोडवलीं. विकलेलीं शेतें दिढी-दुपटी किंमत देऊन, एकेक करून सगळीं परत मिळवलीं. बैलबारदाना जमवला. मोडकळीस आलेला वाडा दुरुस्त केला. समळे दागिने परत घडविले. पुरुषांच्या गळ्यांत कंठ्या, हातांत पोच्या आणि बोटांत आंगठ्या झळकूं लागल्या. घरांत दासी बटकी वावरूं लागल्या. गोठाभर गुरें झालीं. शेतीचीं कामें घरच्या मनुष्यबळावर सुरू झालीं. दगड आणणाऱ्या पुरुषांना अन्नपूर्णेनें आतां शेतांत राबायला लावलें. घरांत दाण्या-गोट्याच्या राशी येऊन पडूं लागल्या. मापणारांचे हात दमूं लागले. पुरुष छाती पुढें काढून गांवांतून चालूं लागले. लोकहि त्यांची आदब राखूं लागले. पूर्वीं टाळणारीं माणसें आता आपणहून पुढें येऊन हस्तिदंती करूं लागलीं. तुटलेले आप्तेष्ट परत जोडले. घरांत आल्यागेल्यांची पंक्तिभोजनें सुरू झालीं.

अन्नपूर्णा त्या भरल्या संसारांत विजलीसारखी वावरत होती. तिची नजर चौफेर होती. आंत-बाहेर घारीसारखें तिचें लक्ष होतें. सर्वांपेक्षां अधिक काम ती करीत होती. तिला श्रीमंती डौल नव्हता.

ती आल्यागेल्याचें नीट पहात होती. घरांतल्या सगळ्यावर तिची मायाहि होती आणि शकहि होता.

असे कांहीं दिवस आनंदाचे गेले. त्यानंतर एके दिवशीं तिन्ही सांजा अन्नपूर्णा अंगणांत तुळशीवृंदानापुढें आली. तिनें सांजवात लावून तुळशीला नमस्कार केला. प्रदक्षिणा करीत असतांना तिला दिसलें. कीं कोणीतरी सवाष्ण बाई घरांतून बाहेर चालली आहे. ती स्त्री गोरीगोमटी, सुरेख, दागिन्यांनीं मढलेली, टवटवीत आणि घवघवीत होती. अन्नपूर्णेला आश्चर्य वाटलें. ती मनांत म्हणाली, 'ही बाई कोण ? दिसते तर अनोळखी. हिला घरांत शिरतांना कांहीं आपण पाहिलें नाहीं. मग ही होती कुठें ? आणि मला न भेटतांच ही परत काय म्हणून जाते.........'

अन्नपूर्णेनें पुढें होऊन तिला अडवलें. 'बाई, तुम्ही कोण ?' म्हणून तिला विचारलें. त्यावर ती स्त्री बोलली.

"मी साक्षात् लक्ष्मी आहें."

"लक्ष्मी ऽ ऽ !.........अगबाई ! मी नमस्कार करतें. पण मला हें सांग कीं, तूं या घरांतून तिन्हीसांजच्या वेळीं निघून चाललीस ती कां ?"

"आले होतें तुझ्या कर्तबगारीला भाळून. आतां निघून जातें ती या घरांत अशुभ झालं म्हणून."

"काय झालं अशुभ ? मला सांग."

"थोडया वेळपूर्वी तुझ्या कुळंबिणी सडलेले तांदूळ पाखडीत बसल्या होत्या. समोर कोंडयाचा ढीग जमला होता. त्या कोंडयाच्या

खमंग वासाला भुलून तिकडून एक गाय आली. तिनें कोंडयाला एक जीभ मारली. एवढ्यांत तुझी जाऊ पुढें आली. तिनें लसालसा कोंपऱ्यांतली केरसुणी उचलून गाईच्या तोंडावर मारली. गाईला लागलं. ती बिचारी मागें सरली. मीं हा प्रकार पाहिला. मला तो अशुभ वाटला. मीं मनांत म्हटलं, कीं 'यापुढं या घरांत अशाच गोष्टी घडत जातील.' या घटकेपासून कृपणपणा, खोटी बुद्धि, यांचा जणूं 'श्रीगणेशाच' झाला. यापुढें हें घर, ही वास्तु, मला वास्तव्य करायला योग्य होणार नाहीं. म्हणून मीं ठरवलं, कीं या घरांतून तडक चालतं व्हायचं."




लक्ष्मी घरांतून निघते

कातर वेळीं रातकिडे किरकिरूं लागण्याच्या समयीं आपल्या घरांतली लक्ष्मी निघून जात आहे, हें प्रत्यक्ष पाहून आणि तिचे ते तीक्ष्ण, रुक्ष बोल ऐकून अन्नपूर्णेच्या काळजांत धसका बसला. पण बाई धीराची होती, हजरजबाबी होती. तिनें धीर सोडला नाहीं. ती त्या जात्या लक्ष्मीला म्हणाली.

" लक्ष्मीदेवि, तूं स्वतंत्र आहेस. जाणं किंवा राहणं हें तुझ्या स्वाधीन ! मी तुला अडवूं शकत नाहीं. पण माझी एकच इच्छा आहे—"

" कसली इच्छा ? "

" मी या घरची गृहिणी आहें. मला कांहीं रीतीभाती माझ्या सासूनें शिकवल्या आहेत. तिन्हीसांजा सवाष्णबाई घरांतून जाऊं लागली, तर तिला कुंकू लावल्याशिवाय जाऊं द्यायचं नाहीं. तेव्हां तूं घरांत ये. मी तुला कुंकू लावतें तेवढं लावून घे. "

लक्ष्मी त्या गोष्टीला कबूल झाली. अन्नपूर्णेच्या मागून परत घरांत गेली. अन्नपूर्णेनें तिला देवघरांत नेलें. चांदीच्या फुलाचा पाट मांडून त्यावर तिला बसवलें. पाटापुढें चटकन् रांगोळीच्या दोन सरळ रेघा ओढल्या. दिव्याची वात मोठी केली. मग ती लक्ष्मीला म्हणाली.

मी कुंकवाचा करंडा घेऊन येतें. तोंवर थांब....पण माझी पाठ वळल्यावर तूं निघून नाहीं ना जाणार ? "

" नाहीं. तूं येऊन कुंकू लावीपर्यंत मी जाणार नाहीं. "

" वचन ? "

" वचन !! "

अन्नपूर्णा देवघरांतून बाहेर आली. पण ती कुंकवाच्या करंड्या

कडे न जातां सरळ परसदारीं गेली. तिथें एक विहीर होती. ती खूप खोल होती आणि पाण्यानें भरलेली हाती. अन्नपूर्णेनें कसला तरी निर्धार केला. तिनें ओचा-पदर बांधला, ती विहीरीच्या काठांवर येऊन उभी राहिली. तिनें एकवार त्या सर्व घरादाराला हात जोडला आणि लगेच आपला देह विहिरींत झोकून दिला. ' धप्प ' असा आवाज उठला. विहिरीचें पाणी शहारलें. आजूबाजूचा आसमंत शहारला. ती घेरून येणारीं काळोखी रात्रहि शहारली. एक उडी, एक क्षण आणि एक घोट पाणी ! त्यानंतर सगळें शांत शांत ! ' ॐ शांतिः शांतिः शांतिः !'

अन्नपूर्णा परत आली नाहीं आणि तिच्या भाकेला अडकलेली लक्ष्मी त्या घरांतून गेली नाहीं. जाऊं शकली नाहीं !!



# अपराध आणि शिक्षा

गुजरातमधलें देवडिया नांवाचें एक गांव. सुखी आणि समृद्ध. सुलतान मंदोदरखान हा तिथला अधिपति. आतां खान झालेला; पण पूर्वीचा राठोड वंशांतला राजपूत. तो स्वभावानें उमदा होता आणि धर्माविषयीं पक्षपात करणारा नव्हता. त्याला सगळी प्रजा सारखी होती. सूर्याचे किरण जसे उंचसखल सर्व प्रदेशांवर पडतात, त्याप्रमाणें त्याचें प्रेम सर्वांवर सारखें होतें.

ते दिवस होळीच्या सणाचे होते. काल गांवभर सगळीकडे होळ्या पेटल्या होत्या. मुख्य चौकांतली होळी सर्वांत मोठी होती. गांवांतल्या मुलांनीं डफ, टिमक्या वाजवीत गल्लींतून नि पेठेंतून गोवऱ्या-लांकडें गोळा केलीं होतीं. त्यांचा टेकडीएवढा ढीग घातला होता. संध्याकाळीं सूर्यास्ताच्या वेळीं त्या इंधनराशींत एरंडाचा रोपा पुरून तिला आग लावली होती. मध्यरात्र उलटून जाईपर्यंत त्या चांदण्या रात्रीं गांवांतल्या पोरांनीं आणि तरुणांनीं गाऊन, नाचून तिच्याभोंवतीं धिंगाणा घातला होता.

दुसऱ्या दिवशीं धुळवड. सगळींच आजूबाजूचीं मुलें तिथें गोळा झालीं होतीं. होळीची आतां राख झाली होती. दोनतीन मोठे ओंडके तेवढे पेटत होते. बाकी सगळा ढीग निवाला होता, शांत झाला होता. राख आणि आजूबाजूची धूळ एकत्र झाली

होती. त्यांतच मुलांनीं पाणी ओतून त्याचा राडा केला होता आणि मग धुळवड खेळायला सुरुवात झाली होती.

प्रथम त्यांनीं स्वतःला रंगवून घेतलें होतें. काळींसावळीं मुलें चक्क गोरीं गोबरीं झालीं होतीं. गोऱ्या मुलांना शबल वर्णाची अवकळा आली होती. कपाळीं राखेचे उभे नाम, नाकाखालीं कोळशाच्या मिशा, अन् अंगावर काळेगोत्रे पट्टे. तीं मुलें जणूं संकासुराच्या वंशांतलीं होतीं.

त्या दिवशीं त्या रस्त्यानें जाणारा कोणीहि माणस धड्या अंगानें सुटणें शक्य नव्हतें. मोठा माणूस असला तरी एक-दोन चिखलाच्या गोळ्या त्याच्या धूतवस्त्रावर शिक्का उठवून जायच्याच. तरुण असला, बरोबरीचा असला, तर मग त्याच्या कपड्यांवर काळेतांबडे पंजेच पंजे उठायचे अन् वर पिचकारीचे फवारे उडायचे. जो अंग चोरून जाईल किंवा दुरून पळत सुटेल त्याची विटंबना तर विचारूंच नका! सगळीं पोरें त्या दिवशीं मोकाट सुटलीं होतीं. सुलतानाचा आठ वर्षांचा मुलगाहि त्या वानरसेनेंत सामील झाला होता. तोहि रंगत होता, रंगवीत होता. पळत होता अन् ओरडत होता. सकाळपासुन कितीतरी माणसें त्या पोरांनीं अशीं छापून, रंगवून काढलीं होतीं.

आतां दिवस दुसरा प्रहर चढूं लागला होता. एवढ्यांत दुरून एक मनुष्य येत असलेला त्या पोरांनीं पाहिला. तो जवळच्याच एका गांवचा चारण होता. तो रस्ता विचारीत विचारीत येत होता, त्यावरून पोरांनीं ताडलें, कीं पाहुणे परदेशी आहेत! तो गृहस्थ

चाळिशीच्या घरांतळा होता; पण त्याच्या चेहऱ्यावर अकालीं आलेल्या वार्धक्याची छटा दिसत होती. डोळ्यांत दैन्य सांकळलें होतें. ठेवणींतला पोषाख करून तो आला होता. अजूनपर्यंत रंगाचा किंवा राखेचा शिंतोडाहि उडूं न देतां तो इथवर पोंचला होता. तंग तुमान, तिच्यावर चुणीदार आखूड अंगरखा, त्याचे पुढें लोंबणारे गोंडे, डोक्यावर पिळाची पगडी आणि काखेला तलवार अशा वेषांत ती बावळी स्वारी पुढें पुढें येत होती. त्याच्या तलवारीचें म्यान फाटलेलें होतें, त्यामुळे तिची धार बाहेर डोकावत होती.




मुलें चारणाला रंगवतात

चौकांतला मुलांचा घोळका पाहून तो दबकला. दुसरीकडून कुठें रस्ता आहे का, हें पहात तो कांहीं क्षण उभा राहिला. त्याला

त्या पोरांना टाळायचें होतें. इच्छित स्थळीं सुरक्षित जायचें होतें.

पण पोरें कसलीं वस्ताद ! त्यांनीं त्याचा भाव हेरला आणि आरडाओरडा करीत त्याच्या अंगावर चाल केली. चारण हात जोडून 'नको नको' म्हणूं लागला. मागच्या पावलीं मागें मागें सरकूं लागला. पण पोरांनीं त्याच्या विनवणीला दाद दिली नाहीं. त्यांनीं चहूंबाजूंनीं त्याच्यावर चिखलाचा मारा सुरू केला. तो रडकुंडीला आला तशीं पोरें अधिकच चेवलीं. त्याच्या अंगाला बिलगून तीं त्याला रंगवूं लागलीं. कुणीं तोंडावर पट्टे ओढले. कोणीं कपड्यावर छाप उठविले. कोणीं त्याची पगडी उडवली. कोणी सदरा वर करून त्याच्या पाठी-पोटाला राख माखली. पाहुणा जणूं चक्रव्यूहांत सांपडला. त्याला पळतांहि येईना अन् प्रतिकारहि करतां येईना.

एवढ्यांत नकळत त्याचा डावा खांदा वर उचलला गेला. त्याच्याखालीं दाबून धरलेली ती तलवार त्यासरशीं सुटली अन् खालीं पडली. पण ती जमिनीवर न पडतां नेमकी एका मुलाच्या अंगावर पडली. म्यान फाटलेलें असल्यामुळें तिची धार त्या मुलाच्या पोटांत रुतली. पोरगा एकदम किंचाळला आणि जमिनीवर पडला. त्याच्या जखमेंतून रक्ताच्या धारा वाहूं लागल्या. डोक्याखालीं रक्ताचें थारोळें झालें. पोरगा नखशिखांत रक्तानें न्हाऊन निघाला.



कुंवर मरून पडतो.

मग सगळीं पोरें एकदम भानावर आलीं. सर्वांनीं पाहुण्याला सोडून त्या घायाळ मुलाभोंवतीं कडें केलें पाहतात तों तो सुलतानाचा मुलगा कुंवर! तो नाजुक होता, सुंदर होता अन् राजबिंडा होता. पण आतां त्याची अवस्था कठीण झाली होती. रक्तप्रवाह थांबला नव्हता. पोरें भयभीत होऊन त्याच्याकडे नुसतींच टक लावून पाहात होतीं. ताबडतोब कांहींतरी उपचार करायला हवा, हे त्यांना कळलेंच नाहीं. थोड्या वेळांत आजूबाजूचीं माणसें धावून आलीं अन् त्यांनीं पोरांना मागें हटविलें.

पण आता उशीर झाला होता. मुलाच्या अंगांतून कमालीचा रक्तस्राव झाला होता. हातपाय गार पडूं लागले होते. मुखावर हां हां म्हणतां अवकळा आली होती. पंचप्राणांनीं त्याच्या इवल्याशा हृदयांतून प्रस्थान काढलें होतें. गर्दींतला कुणी तरी एक त्या पोराला उचलण्यासाठीं पुढें झाला, पण तेवढ्यांत त्याची प्राणज्योत विझलीसुद्धा. त्याच्या खांद्यावर चढलें तें निष्प्राण कलेवर

"अरेरे!" सर्वांच्या तोंडून दु:खोद्गार निघाले. चारण हें सगळें दुरून पाहात होता. आपल्यावर अलाबला आली असें जेव्हां त्याला कळलें, तेव्हां त्यानें तिथून हळूच काढता पाय घेतला. पण तरीहि तो भयानें अर्धमेला झाला. त्याच्यावर आकाशाची कुऱ्हाड कोसळली होती. इच्छा नसतांना केवळ दैवयोगानें त्याच्या हातून भयंकर गुन्हा घडला होता. पुढें काय होईल तें सांगवत नव्हतें. ठाकुराचा क्रोध म्हणजे जिवाशीं गांठ होती. त्याच्या धडावरची गर्दन उतरायला वेळ लागला नसता. त्याच्या

दुर्दैवानें त्याला भलत्याच आपत्तींत टाकलें होतें. तो आला होता कशासाठीं अन् झालें काय !

पण जिवाची आशा ही सर्वांत प्रबळ ! आजचें मरण उद्यांवर ढकलावें शक्य तर तें टाळावेंच; ही सर्वांची उपजत प्रवृत्ति असते. तिला अनुसरून तो हळूच एका गल्लींत शिरला आणि आपल्या गांवच्या रस्त्यानें पळत सुटला. त्याला खरें म्हणजे पळण्याचीहि ताकद नव्हती. पण तरीहि तो जिवाच्या आकांतानें पळतच राहिला.

जमलेले लोक त्या अश्राप कुमाराचें प्रेत घेऊन ठाकुराच्या वाड्यावर आले. ते रडत आक्रोशत आले. कसला हलकल्लोळ आहे तो पहावा म्हणून ठाकूर मंदोदरखान बाहेर आला. जमलेले लोक एकदम बाजूला पांगले. ठाकुराची दृष्टि जमिनीवर पडली. पहातो तर तिथें त्याच्याच मुलाचें प्रेत ! उरीं घाव लागला आहे, अंग रक्तानें माखलें आहे, डोळे शून्यांत गेले आहेत आणि प्राण परागंदा ! त्यानें कडाडून विचारलें.

" काय झालं हें ! माझ्या मुलाचा खून कोणीं केला ? "

पण कोणी हालेना, कोणी बोलेना. सगळ्यांची जणुं दांतखीळ बसली होती. सर्वांच्या काळजांत घणाचे घाव बसत होते. कोणीं बोलायचें अन् कोणीं सांगायचें ? हिंमत होती कोणाला ? ठाकूर पुन्हा कडाडला.

" अरे बोला ना ! माझ्या कुंवरचा प्राण घेणारा हा हरामजादा कोण ? कोण्या चांडाळाला आपल्या जिवाचा कंटाळा आला आहे ? "

अपराध आणि शिक्षा 23
16 2112

गर्दीतून कोणीं तरी एका मुलाला पुढें केलें. त्यानें रडत रडत, मनगटांनीं डोळे पुशीत, कशीबशी ती सगळी हकीगत ठाकुराला सांगितली —

" ठाकूरजी ! कोणी तरी मेहमान होता. आमच्या ओळखीचा नव्हता. त्यानं मारलं कुंवरला. मागच्या पावलीं वेशीच्या बाहेर पडून पसार झाला तो."

तें ऐकताच ठाकुराच्या डोळ्यांत एकाएकीं रक्त उतरलें. त्याची मुद्रा कठोर झाली. खालचा ओठ दांताखालीं दाबला गेला. त्याचें मस्तकच नव्हे; तर सर्वांग तापून उठलें. त्यानें मोतद्दाराला म्हटलें– " माझी घोडी बाहेर काढ. "

कांहीं क्षणांतच घोडी वाड्याच्या दारांत येऊन फुरफुरली. ठाकुरानें कटिबंधात आपली तलवार खुपसली आणि घोडीवर उडी मारली. ठाकुराची एक टांच बसतांच घोडी चौखूर उधळली. रस्त्यांतले लोक जीव घेऊन बाजूला झाले. या वेळीं त्याला अन् त्याच्या त्या ' रोजडी ' घोडीला कोणाचीहि पर्वा नव्हती. त्या घोडीच्या टापांतून जणुं एकच ध्वनि बाहेर पडत होता. ' सूड ! सूड ! सूड ! '

चारण पायांनीं पळत होता. ते पायहि अशक्त अन् दुबळे होते. शिवाय त्यांच्यांत भयाचें कापरेंहि भरलें होतें. ठाकूर घोडी उधळीत त्याचा पाठलाग करीत होता. मग त्या दोघांची गांठ पडायला कितीसा उशीर लागणार ! चारणानें घोड्यांच्या टापा ऐकल्या तेव्हांच ताडलें, कीं आपलीं शंभर वर्षे भरलीं. ठाकूर

जेव्हां दिसला, तेव्हां तर तो त्याला साक्षात् मृत्युच वाटला. त्याच्या तावडींत सांपडायचें, जिवाचे हालचाल करून घ्यायचे आणि शेवटीं जळून-भाजून, घाव लागून, शिव्याशाप घेत घेत मरायचें.... त्यापेक्षां—

रस्त्यापासून थोड्या अंतरावर त्याला एक विहीर दिसली. त्या विहिरींत उडी घेऊन आपल्या हातानें आपल्या इच्छेनें जीवन समाप्त करावें हें बरें, अशा विचारानें तो रस्ता सोडून आडरानांत शिरला. ठाकुरानें तें पाहिलें. त्याला त्या हतभागी जिवाचा बेतहि कळला. त्यानें एकदम वृक्ष-पाषाणांनाहि कंपित करणारी गर्जना उठवली—

" ठहरो ! "

तो पळता जीव तिथल्या तिथें थबकला. त्याचे पाय जमिनीला खिळले ! जाणीवनेणीव सगळें कांहीं एका क्षणांत मावळलें. तो नुसता निर्जीव खुंट बनला. ठाकूर त्याच्या समोर येऊन घोडी-वरून उतरला. " सांपडलास ! " त्याच्या तोंडून उद्गार निघाला ! त्यानें तीक्ष्ण शब्दात दांतओठ खात त्याला विचारलें.

" कोण आहेस तूं? "

चारणाची जीभ टाळूला चिटकली. कसेंबसें तो म्हणाला—

" मी ... मी.... मी ... चारण. "

" माझ्या कुंवरचा खून तूं केलास ? "

" ईश्वराला ठाऊक ! मी तुमच्या कुंवरला ओळखीतसुद्धा नाहीं. मला एवढंच माहीत आहे, कीं कोण्या तरी मुलाला घाव लागला अन् तो खालीं पडला ! "

" अस्सं काय ! "

" खरं आहे महाराज ! सगळ्या पोरांनीं मला घेरलं. माझ्या अंगावर मातीचे गोळे उडवले, माझे कपडे रंगवले. माझ्या डोळ्यांतहि राख उडवली. मी नको नको म्हणत होतों. पोरांच्या



चारण व मंदोदरखान

घोळक्यांतून बाहेर पडूं पहात होतों. स्वतःला बचावूं पहात होतों. त्या धांदलींत माझ्या काखेंतली तलवार निसटली. तिचं म्यान फाटलं होतं. मधेंच धार उघडी पडली होती. ती तलवार कुणाला तरी लागली. एक लहान छोकरा किंचाळून खालीं पडला. एवढंच मीं पाहिलं. कोण तें मला कळलं नाहीं. मला भय वाटलं. पळण्याशिवाय दुसरं कांहींच सुचलं नाहीं. अखेर जीव प्यारा असतो ठाकुरजी !... लागलीच मी पळत सुटलों. "

" कशाला आला होतास या गांवांत ? "

" कशाला....माझ्या कर्मभोगासाठीं ! मी जातीनं चारण आहें, ठाकुरजी. चार गुरं पाळून कसाबसा निर्वाह करीत होतों. मिळतील तसले ओले-कोरडे घांस पोरांच्या मुखांत घालीत होतों. पण....पण...कसली तरी हावळ आली आणि चार दिवसांत माझीं सगळीं गुरं पटापट मरून गेलीं. गोठा रिकामा झाला. चरितार्थाचा धंदा बुडाला. पोरं भुकेनं तडफडूं लागलीं. आज सणाचा दिवस. घरोघर गोड धोड व्हायचं; पण आमच्या घरांत सगळी नकारघंटा ! बायको मला म्हणाली—" तुम्ही ठाकूरजीं-च्याकडे चला. त्यांना तुमची कर्मकथा सांगा. ते दयाळू आहेत. प्रजावत्सल आहेत. कांहीं तरी तुम्हांला देतील. तुमचा हात ओला करतील. येतांना बाजारांतून डाळ गूळ घेऊन या. सण साजरा होईल. पोरं एक दिवस जेवतील. "

त्यावर मंदोदरखानानें विचारलें.

" खरं बोलतोस ? "

" होय ठाकुजी. खोटं बोलेन तर माझ्या पोरांवर पटकी पडो..."

ठाकूर एकदम स्तब्ध झाला. त्याच्या चेहऱ्यावरचे भावहि बदलले. रागाची जागा अनुकंपेनें घेतली. त्याला खरोखरीच वाटलें, कीं हा दुर्दैवी प्राणी अपराध करूनहि निरपराधी आहे तो गप्प आहे असें पाहून चारणच पुढें बोलूं लागला.

" ठाकुरजी ! तुमचा कुंवर माझ्या हातून मारला गेला, हें मला आत्तां कळलं. माझा अपराध दुहेरी आहे. एक तर मी गुन्हा

केला अन् दुसरं म्हणजे पळत सुटलों. ज्या उदार पुरुषाकडे मी हात पसरायला गेलों होतों, त्याच हातानं मी त्याच्या पुत्राच्या मानेवर तलवार घातली. माझ्यासारखा नीच जगांत कुणी नसेल! ठाकुरजी, मी विहिरींत उडी घेऊन जीव देणार होतों. पण आतां तें शक्य नाहीं. आतां माझा जीव तुम्ही घ्या. तुमचा लाडका मुलगा तर मेलाच आहे. तुमचं पुत्रधन कायमचं हरपलं आहे. तुमच्या दुःखाला पारावार नाहीं, हें मी जाणतों. तेव्हां निदान खुनी माणसाला स्वहस्तें देहदंड दिला, मुलाच्या मृत्यूचा सूड घेतला एवढं तरी समाधान तुम्ही उपभोगा. माझी जगण्याची इच्छा आतां पार संपली आहे. ही पहा माझी मान तुमच्यापुढें वाकवतों."

चारण प्रांजळपणें बोलला होता. त्याच्या भाषणांत तिळा–एवढेंहि असत्य नाहीं, हें त्या शहाण्या ठाकुराला कळलें. आतां त्याचा वध करणें, म्हणजे दुसरा खून करण्यासारखें होतें. मंदोदरखानाला तें करावेंसें वाटलें नाहीं. त्याला त्या अभागी चारणाची दया आली. पुत्रशोकापेक्षांहि तो दयेनेंच अधिक द्रवला.

एवढ्यांत त्याला पाठीमागें कोलाहल ऐकूं आला. गांवांतले लोक आरडाओरडा करीत पाठीमागून येत होते. ठाकुरानें खुनी माणसाला पकडलें आहे, तो त्याला लाथाबुक्क्यांखालीं तुडवीत आहे, हें दृश्य पाहायला ते लोक कसे उत्कंठित झाले होते. मंदोदर–खानानें क्षणभर त्या बाजूला पाहिलें. त्याला लक्षण ठीक दिसलें नाहीं. तो चारणाकडे वळून म्हणाला.

"चारणा, गांवातले लोक तुझा पाठलाग करीत येत आहेत.

त्यांना तूं दिसलास, सांपडलास, तर हे बेफाम झालेले लोक तुला दगडांनीं ठेचून मारतील. तुझ्या शरीराच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडवतील. तूं आतां असं कर. ही माझी घोडी इथें उभी आहे तिच्यावर टांग मार आणि पसार हो."

मंदोदरखानाचें तें बोलणें चारणाला चमत्कारिक वाटलें. मंदोदरखान यमदूत नसून दयेचा देव आहे, असा त्याला साक्षात्कार झाला. मंदोदरखान सांगत होता ती गोष्ट किती अस्वाभाविक होती! किती चमत्कारिक होती! ठाकुराच्या घोडीवर आपण टांग टाकायची. त्याच्या मुलाला मारून त्याच्याच घोडी-वरून पळून जायचें. छेः! तो म्हणाला.

"महाराज ......!"

"आतां बोलण्यांत वेळ दवडूं नकोस. सणाच्या दिवशीं माझ्या जहागिरींत एक खून झाला आहे तेवढा पुरे. आतां दुसरा व्हायला नको. हे माझेच लोक; पण या वेळीं मला आवरणार नाहींत. पळ पळ!"

मंदोदरखानानें स्वहस्तें चारणाला घोडीवर बसवलें. तिच्या पाठीवर थाप मारून अश्रूभरल्या डोळ्यांनीं तो म्हणाला.

"रोजडी, सगळं बळ एकवटून दौड मार. या अभागी माणसाचा जीव वाचव...रोजडी, फिर कभी मिलेंगे."

आणि दुसऱ्याच क्षणाला रोजडी एकदम हवा झाली.

पाठीमागून रान उठवीत येणारे लोक आतां जगदीं जवळ पोंचले. त्यांनीं ठाकुराला पाहिलें. तो एका झाडाखालीं उभा होता.

एकटाच होता! रोजडी जवळ नव्हती. तलवारहि गळून पडली होती. लोकांनीं येऊन आपल्या आवडत्या ठाकुराला घेरलें.

" काय झालं ठाकुरजी? खुनी इसम सांपडला नाहीं का?... असं व्हायचं नाहीं. तो सांपडला असलाच पाहिजे."

मंदोदरखानानें आपले दोन्ही हात उभारून सर्वांना शांत करीत गंभीर स्वरांत म्हटलें.

"खुनी सांपडला. या इथेंच सांपडला. पण तो सामान्य मनुष्य नव्हता. मोठा शूर लढवय्या होता तो! एकदम माझ्या–वरच उलटला. त्याची अन् माझी थोडा वेळ घनचक्कर झाली. अखेर तो जितला, मी हरलों. त्यानं माझी रोजडी पकडली आणि तिच्यावर स्वार होऊन माझ्या डोळ्यांदेखत तो पसार झाला...."

त्यावर लोकांनीं एकच गिल्ला केला—

"ठाकुरजी, असली कादंबरी आम्हाला ऐकवूं नका. तुमचा पराभव करून अन् तुमच्याच रोजडीला घेऊन सामनेवाला पसार होणार! झूट! सपशेल झूट! हें स्वप्नांतसुद्धा घडणं शक्य नाहीं."

" जें स्वप्नांत घडणं अशक्य, तें या क्षणीं प्रत्यक्षांत घडलं आहे. पहा तुम्ही! माझी रोजडी जवळपास कुठें दिसते का पहा!"

त्यावर त्यांतलाच एक पोक्तसा माणूस बोलला–

"रोजडी दिसत नाहीं हें खरं; पण ती त्या माणसानं छिनावून नेली नाहीं. ठाकुरजींनाच त्याची दया आली असेल आणि त्यांनींच त्याला घोडीवर बसवून पिटाळून लावले असेल."

मंदोदरखान नुसता हसला. त्यानें तो विषय टाळून लोकांना म्हटलें.

" चला आतां घरच्या वाटेला लागा. "

जमावांतले तरुण लोक त्यावर गर्जून उठले.

" घरीं परत ? खुनी माणसाला पकडल्याशिवाय...नाहीं. आम्हीं हात हालवीत परत जाणार नाहीं. तो सप्त पाताळांत दडला असला तरी त्याला शोधून काढूं. खुनाचा बदला खून ! "

मंदोदरखान पुन्हा एकदा क्षीणपणें हसला आणि शांति न सोडतां म्हणाला—

" मेरे प्यारे भाईयो ! तुम्ही काय पागल बनलां आहांत कीं काय ? तुम्हांला काय वाटलं, कीं त्या माणसानं जाणूनबुजून माझ्या मुलाचा खून केला ? बिचारा दुर्भागी प्राणी आशेनं माझ्या दाराशीं येत होता. आणि मधें हा अपघात घडला. यालाहि न कळतां घडला ! "

लोक पुन्हां ओरडले—

" पण ठाकुरजी ! कुंवर जगांतून नाहींसा झाला त्याची वाट काय ? "

" खुदातालाची मर्जी ! जें नशिबांत होतं तें घडलं. ज्याच्या आयुष्याची दोरी तुटते, तो अशाच कोणत्या ना कोणत्या तरी कारणानं जगांतून नाहींसा होतो...चला भाईहो, आपण सगळे मिळून आतां माझ्या जिवाच्या कलेजाचं इतमामानं दफन करूं. "

मंदोदरखानाच्या या भाषणावर कोणीहि ओरडलं नाहीं कीं गरजलं नाहीं. सर्वांच्या माना खालीं झाल्या. टप्‌टप् गळले ते फक्त अश्रू !!

# कपूर चौहान

गढवालच्या राजधानींत आज विलक्षण धामधूम चालू होती. प्रत्येक माणूस घाईगर्दींत होता. कोणी राजवाडा शृंगारीत होते. कोणी दीपाराधनेच्या तयारींत होते. कोणी हंड्या, झुंबरें लावीत होते. कोणी भिंतीवर चित्रें काढीत होते. कोणी महाद्वारावर तोरणें लावीत होते. कोणी आपापलीं घरें शोभवीत होते. कोणी आपापल्या दारापुढें कणेरांगोळ्या काढून त्यावर पूर्ण कलश ठेवीत होते. कोणालाच फुरसत नव्हती, दम नव्हता.

वाजंत्रीं वाजत होतीं. नगाऱ्याचे प्रतिध्वनी हिमाचलाच्या दऱ्यखोऱ्यांत घुमत होते. राग-रागिण्या आळवण्यांत सनईवाले चढाओढ करीत होते. राजधानींतल्या प्रत्येक माणसाचें मन राजवाड्याकडे ओढत होतें. रस्त्यावर जागोजागीं उभारलेल्या कमानींतून माणसांची नदी राजवाड्याकडे वाहत होती. आसपासच्या राज्यांतले सामंत – सरदार आणि छोटे छोटे राजे त्याच कमानींतून वांकल्या मानेनें राजवाड्याच्या महाद्वारांत प्रविष्ट होत होते. त्यांच्या मागून त्यांचा लवाजमा होता, शिपाईप्यादे होते आणि करभाराचें ओझें घेऊन चालणारे भारवाहकहि होते. हिमालयाच्या चढणी चढत गढवालमध्यें पोंचेपर्यंत त्यांच्या अंगातून घामाच्या धारा सुरू झाल्या होत्या. हा सर्व सोहळा

राज्याभिषेकासाठीं होता. गढवालचा राजा अजयपाल हा उद्यां सिंहासनावर बसून मंडलेश्वर या नात्यानें स्वतःला राज्याभिषेक करून घेणार होता.

अजयपाल हा महत्वाकांक्षी आणि तितकाच पराक्रमी असा वीर पुरुष होता. हिमालयांतल्या छोट्या मोठ्या बावन्न राजांना जिंकून त्यानें त्यांना आपले मांडलिक बनवलं होतं. त्याचा दरारा सर्वत्र गाजत होता. त्याचें नांव उच्चारतांच माणसेंच नव्हेत तर भुतेंखेतेंसुद्धा चळचळां कांपत होतीं. एखाद्याच्या मानगुटीवर बसलेला ब्रह्मसमंध किंवा आग्यावेताळ झाड सोडीनासा झाला, मंत्र-तंत्राचे सर्व उपाय हरले, कीं हिमाचलांतले देवर्षि आणि भगत त्या महाखट पिशाचांना अजयपालाचा धाक घालीत होते. आणि त्यासरशीं तीं पिशाच्चें 'झाड' सोडून मुकाट्यानें गति घेत होतीं.

अजयपालानें आपल्या प्रधानाकरवीं राज्याभिषेकाला आलेल्या सामंतांचें आणि गढपतींचें स्वागत केलें. ज्याच्या त्याच्या इतमामा-प्रमाणें ज्याची त्याची व्यवस्था लावून दिली. रात्रीं प्रधानाला बोलावून कोण कोण आले आहेत त्यांची त्यानें नांवनिशी विचारली. आलेल्या सन्मान्य पाहुण्यांची यादी प्रधानानें वाचली. अजयपाल एका नांवाविषयीं उत्सुक होता. तें नांव त्याला ऐकायचें होतें. पण प्रधानानें यादी वाचून संपवली, तरी त्यांत तें नांव आलें नाहीं. अजयपाल क्षणभर विरमला. दुसऱ्याच क्षणाला त्याची चर्या त्रस्त दिसूं लागली. त्यानें आपला अधरोष्ठ दांताखालीं दाबीत प्रधानाला विचारलें.

" प्रधानजी, कफ्फू चौहानाला राज्याभिषेकाचं निमंत्रण गेलं नव्हतं ? "




अजयपाल आणि प्रधान

" गेलं होतं सरकार. मीं खलिता देऊन एक स्वतंत्र स्वार पाठविला होता." प्रधानानें हात जोडून आपला अन्याय नसल्याचें राजाला जाणवलें.

" मग तो कां आला नाहीं? "

" तें आतां मीं कसं सांगावं महाराज ! "

" राज्याभिषेकाची तिथि कळवण्यांत आणि निमंत्रण योग्य

शब्दांत देण्यांत तुमची कांहीं चूक झाली नाहीं ना?" अजयपालाचा स्वर थोडा चढला.

"मुळींच नाहीं महाराज! मीं तिथि, वार, नक्षत्र इतकंच नव्हे; तर मुहूर्ताची वेळसुद्धा कळविली होती. आदल्या दिवशीं उपस्थित होऊन समारंभांत सहभागी होण्याबद्दलहि बजावलें होतें."

"अस्सं... अन् तरीहि तो आला नाहीं. अजून यायची वेळ आहे?"

"आहे सरकार. मध्यरात्रीपर्यंत तो गडावर येऊन पोंचेल कदाचित्! नाहींतर उद्यां मुहूर्ताच्या वेळेपर्यंत तरी त्याला इथें येऊन दाखल झालंच पाहिजे."

"नाहीं येणार तो. भ्रम आहे तुम्हांला. कफ्फु चौहानला तुम्ही ओळखत नाहीं. मी ओळखतों. त्याच्या अंगीं विलक्षण पीळ आहे. त्याला माझं मांडलिक व्हायचं नाहीं आहे. स्वतंत्र राजा म्हणून त्याला माझ्या मांडीला मांडी लावून बसायचं आहे. स्वतःचा तोरा मिरवायचा आहे... पण मी हें चालूं देणार नाहीं. बावन्न राजे मीं माझ्यापुढें नमवले. त्यांच्या रत्नजडित मुकुटांच्या प्रकाशांत मीं माझे पाय उजळून घेतले. पण हा हट्टी माणूस माझी पायमल्ली करतो आहे."

"खरं आहे सरकार. हा अक्षम्य अपराध आहे. महाराजांच्या पुढें गर्व करणं म्हणजे काजव्यानं सूर्याला वांकुल्या दाखवण्यासारखं आहे." प्रधान जणुं आपणच गुन्हेगार आहोंत, अशा स्वरांत अजीजीनें बोलला.

" प्रधानजी, आत्तांच्या आत्तां एक घोडेस्वार उपगडावर पिटाळा. कफ्फू चौहानला त्याच्या हातीं खलिता पाठवा. त्याला म्हणावं, बऱ्या बोलानं राज्याभिषेकाला ये. माझं मांडलिकत्व सर्वांच्या समक्ष कबूल कर. मला करभार दे. आणि माझ्या कृपेचा कटाक्ष घेऊन माझा सामंत म्हणून तुझ्या उपगडावर परत जा... नाहींतर मी तुझं राज्य धुळीला मिळवीन. मी एकदा खवळलों कीं वैश्वानर आहें."

अजयपाल आपल्या प्रधानाला अशी आज्ञा करून तणतणत महालांत निघून गेला. त्या अंधाऱ्या रात्रीं हिमाचलाच्या एका गिरिशिखरावर उभा असलेला त्याचा गड एखाद्या दीपमाळेसारखा नखशिखांत प्रकाशानें न्हाऊन निघाला होता. जिकडे तिकडे दिवेच दिवे! प्रकाशच प्रकाश! तिथला सारा अंधार खालच्या दऱ्याखोऱ्यांत अंग चोरून लपून बसला होता. पण एवढ्या सगळ्या प्रकाशाच्या रोषणाईंत आणि आनंदाच्या दिवाळींत अजयपालाचें हृदय मात्र तमानें ग्रासलें होतें. तो चडफडत होता. परांच्या गादीवर सुगंधी पुष्पांच्या घमघमाटांत आणि सर्व प्रकारच्या भोगविलासांतहि तो तळमळत होता. आणि त्याला एकच कारण म्हणजे कफ्फू चौहाननें त्याची सत्ता मानली नव्हती. अजयपालाचा राज्याभिषेक म्हणजे ती एक क्षुद्र घटना आहे अन् आपल्याला तिच्याशीं कांहीं कर्तव्य नाहीं, असें तो समजला होता आणि आपल्या उपगडावर स्वस्थ राहिला होता.

गेलेला स्वार परत आला. त्यानें कफ्फू चौहानच्या उत्तराचा

खलिता बरोबर आणला होता. तो अजयपालाच्या हातीं देतांना तो स्वार हिंव भरल्यागत थरथरत होता. प्रधानाचें काळीज धडधडत होतें. आणि जवळपासच्या दासदासी जीव मुठींत घेऊन उभ्या राहिल्या होत्या. कारण कफ्फू चौहाननें अजयपालाच्या खलित्याला दिलेलें उत्तर तितकेंच तिखट होतें. अजयपालाच्या पोसलेल्या अहंकाराला दंश करणारे होतें. कफ्फू चौहाननें लिहिलें होतें--


"मी हिमाचलांतल्या पशूंमधला सिंह आहे. मी पक्ष्यांतला भरारी मारून झडप घालणारा गरुड आहें. मी नाहीं तुझ्या राज्याभिषेकाला येणार. तूं हवे तेवढे जलकलश डोक्यावर ओतून स्वतःला भिजवून घे. मंडलेश्वर म्हणून आरत्या ओवाळून घे. कांहीं निर्बुद्ध आणि स्वाभिमानशून्य अशा गणपतींचें आपल्याभोंवतीं कोंडाळें कर. मंडलेश्वर म्हणून खुशाल बढाया मिरव. पण मला तिच्याशीं कांहींहि कर्तव्य नाहीं. ती तुला मानीन; पण माझ्या बरोबरीचा एक राजा म्हणून. केवळ गढवालचा अधिपति म्हणून. मंडलेश्वर या नात्यानें मी कदापि तुला ओळखणार नाहीं. याद राख, माझं कांहीं वांकडं करण्याचा प्रयत्न केलास तर! मी सरळ तुझ्या राजधानीवर येऊन हल्ला चढवीन. तुझी राजधानी जाळीन. गडाच्या भिंती जमीनदोस्त करीन. तुझीं उद्यानं उपवनं उद्ध्वस्त करीन. शहाणा असशील, तर माझ्या वाटेला जाऊं नको."

कफ्फू चौहानची म्हातारी आई होती. आपल्या मुलानें अजयपालाला इतकें लागट, सडेतोड आणि झोंबणारें उत्तर दिलेलें तिला आवडलें नाहीं. अजयपाल हा केवढा पराक्रमी आहे आणि किती दीर्घद्वेषी आहे, हें तिला ऐकून ठाऊक होतें आणि आपल्या

मुलाचा पराक्रम मात्र अजून तिला पहायला मिळाला नव्हता.

'अजयपालाचा तूं असा अधिक्षेप करायला नको होतास,' असें जेव्हां ती म्हणाली, तेव्हां कफ्फू तिला बोलला.

"आई, आजवर खूप सहन केलं. मी होऊन कधींहि त्याच्या वाटेला गेलों नाहीं. त्यानें मात्र माझी अनेकदा अनेक प्रकारें आगळीक केली आहे. माझ्या प्रजेनं घाम गाळून पिकविलेलीं डोंगरी शेतं त्यानं कित्येकदा कापून नेलीं आहेत. कित्येकदा घोडे-




कफ्फू चौहानची प्रतिज्ञा

स्वारांचीं पथकं घालून उभीं पिकं तुडवून टाकलीं आहेत. त्यानं माझे बांध मोडले आहेत. त्यानं सीमेवरचीं गुरंढोरं अन् माणसं-

सुद्धा पळवलीं आहेत. मीं शरण यावं, मांडलिक व्हावं, म्हणून आडवळणानं तो हे निर्लज्ज उद्योग करीत आहे. पण मी आतां त्याला चांगलाच धडा शिकविणार आहें. एकदा त्याची पुरती खोड मोडणार आहें."

"बाळ, तूं म्हणतोस तें सगळं खरं; पण बळिवंताशीं वैर करूं नये, अशी राजकारणांतली नीति आहे. तो धनानं कुबेर आहे. आणि सैन्यबळानंहि तुझ्याहून वरिष्ठ आहे."

"असेल. म्हणून मीं त्याच्यापुढें नमावं काय? राजा मोठा झाला, द्रव्यानं कुबेर झाला, म्हणून त्यानं काय शेजारच्या राज्यांत, त्या राजानं कांहींहि आगळीक केली नसतां, असा धुमाकूळ माजवावा? आई! मी क्षत्रियाचा बच्चा आहे. एकदा त्याची माझी होऊन जाऊं दे. फार तर काय होईल? माझा बलपराक्रम त्याच्यापुढें अपुरा पडेल अन् मी मरेन. बेहत्तर आहे मेलों तरी! पण अजयपालाची असली अरेरावी मी चालूं देणार नाहीं. मला प्राणांचं मोल आहे. पण प्राण स्वाभिमानाचा श्वासोच्छ्वास करणार असतील तर ......"

बिचारी आई! पोराच्या कळवळ्यानें बोलायला गेली; पण शेवटीं गप्प बसली. तिला त्याचें म्हणणें पटत होतें. पण त्याच वेळीं तिच्या वत्सल मातृहृदयाला मुलाच्या भवितव्याविषयींची चिंताहि जाळीत होती. 'परमेश्वरा! गौरीशंकरा! आतां तूंच राख माझ्या पोराला!' असें म्हणून तिनें हात जोडले आणि ती स्वस्थ बसली.

कफ्फू चौहानला कळलें, कीं आतां आपल्यावर अजयपालाची संक्रांत येतणार. तो आमसंरक्षणाच्या तयारीला लागला. त्यानें गडावरच्या आपल्या सैन्याला सावध राहण्याचा हुकूम दिला. गडाखालच्या आपल्या प्रजेला जागोजागी मोर्चे बांधून सज्ज राहण्याबद्दल फर्माविलें. गडावर दाणागोटा पुरेसा आहे कीं नाहीं तें एकदा त्यानें पाहून ठेवलें. शस्त्रास्त्रांची डागडुजी करून घेतली. लोहारांना नवीं कोरी शस्त्रास्त्रें बनवायला बसवलें. जाणाऱ्या येणाऱ्या माणसांवर लक्ष ठेवण्याबद्दल अधिकाऱ्यांना हुकूम दिले.

कफ्फू चौहान तयार जय्यत होऊन बसला. त्यानें कल्पना केली होती, कीं राज्यभिषेकाचा समारंभ उरकतांच इतर सगळी कामें बाजूला टाकून अजयपाल आपल्यावर स्वारी करील ! आणि त्याची ती कल्पना खरी ठरली.

ठरल्याप्रमाणें अजयपालाला राज्याभिषेक झाला. ब्राह्मणांनीं मंत्र म्हटले. बंदी-भाटजनांनीं स्तुतिस्तोत्रें गायलीं. भालदार चोप-दारांनीं ललकाऱ्या दिल्या. सामंतांनीं जयघोष केले. नगारे आणि इतर वाद्यें यांच्या गजरांत अजयपाल मंडलेश्वर झाल्याची ग्वाही फिरवण्यांत आली. नंतर दरबार भरला. अहेर–नजराणे झाले. गवयी गायले. नर्तिका नाचल्या. पानसुपारी, दक्षिणा, संभावना, देकार, शेलापागोटीं, जेवणावळी इत्यादि सगळे सोपस्कार यथासांग घडले.

पण त्यांतला एकहि उपचार अजयपालाच्या अंगीं लागला नाहीं. गंगाजलाचा अभिषेक मस्तकावर होत असतांनाहि तो

आंतून धुमसत होता. मुजरे घेतांनाहि असंतुष्ट होता. नृत्यनाट्य पाहतांनाहि मुठी आवळीत होता. हें सगळें केव्हां एकदा उरकेल आणि आपण केव्हां एकदा कफ्फू चौहानावर जाऊन धडकूं असें त्याला झालें होतें.

समारंभाला आलेली पाहुणे मंडळी निघून जातांच अजयपालानें सैन्याला एकत्र होण्यासाठीं शिंग फुंकलें. थोड्याच वेळांत घोडदळ, पायदळ गडाच्या महाद्वारांतून बाहेर पडलें. अजयपाल जातीनें त्या मोहिमेवर निघाला. तो सर्वांच्या पुढें राहिला. डोंगरी वाटेनें सैन्य खालीं उतरूं लागलें. कांहीं टेकड्या उतरायच्या आणि कांहीं चढायच्या असा त्यांचा तो मार्ग होता. शेवटची टेकडी उतरल्यानंतर तिच्या पायथ्याला लागून भागीरथी गंगा वाहात होती. पाणी खोल नव्हतें.; पण त्याला ओढ जबरदस्त होती. तो जलप्रवाह मुसंडी मारल्यागत दऱ्याखोऱ्यांतून खालीं धावत होता. जो आंत पाय टाकील तो आडवाच पडायचा. अन् एकदा पडला कीं, पुनश्च हातीं लागायची बातच नको.

कफ्फू चौहानचा उपगड गंगा नदीच्या पलीकडे होता. त्याच्या प्रदेशांत उतरायचें तर गंगा नदी पार करणें भाग होतें. पण कफ्फू चौहाननें त्याची सोय करून ठेवलेली होती. त्यानें गंगेवर चार दोन ठिकाणीं सांकव घातलें होते. ते तात्पुरते उभारलेले लाकडी पूल माणसें वरून चालायला लागलीं, की डगडग हालत; पण तरीहि ते मोडणार नाहींत इतकी घटवाई कफ्फूनें त्यांना दिलेली होती. ती गंगा नदी म्हणजे कफ्फूच्या राज्याला एका बाजूनें जणूं दुर्लंघ्य असा खंदकच बनली होती.

कफ्फू चौहानची आई गडावरच्या आपल्या महालांत बसली होती. गडाची ती बाजू गंगेकडची होती. तिथल्या खिडकींतून ती रोज तासन्तास हिमाचलाच्या त्या भरगच्च टेकड्या, त्यांतून वहाणारे जलप्रवाह, खालून खळखळणारी पावनी गंगा आणि तिच्या कांठचे उंच वाढलेले देवदार वृक्ष, हें निसर्गाचें कुबेर-वैभव पहात बसत असे. गंगेवरून येणारा वारा आपलें तन-मन पुनीत करीत आहे असें तिला वाटत असे.

पण त्या दिवशीं तिला काय दिसलें! समोरच्या टेकडीवरून सैन्याचा एक लोंढाच्या लोंढा खालीं उतरत आहे. तिनें ताडलें, कीं अजयपालाची धाड आली. तिचें काळीज धसकलें. प्रसंग बांका आला, असें तिला वाटलें. भवितव्यतेच्या उदरांत काय लपलें आहे हें न कळून तिची मुखमुद्रा फटफटीत पडली. तिनें दासी-करवीं आपल्या मुलाला महालांत तांतडीनें बोलावून घेतलें आणि एखाद्या पाणलोटाप्रमाणें धो धो खालीं उतरणारें तें सैन्य दाखवून त्याला म्हटलें.

"पाहिलंस?"

"हो, पाहिलं. मला यांत अनपेक्षित असं कांहीं नाहीं."

"मग तूं काय करणार आहेस आतां?"

"शत्रूला सामना देणार आहें. मीं तशी तयारी केली आहे."

"माझ्या बाळा, तुझी तयारी व्यर्थ आहे. अजयपालाच्या धडकेसरशीं तुझा चुराडा होईल. राज्य उद्ध्वस्त होईल. हें अरिष्ट नको ओढवून घेऊं."

" मग काय करूं आई ? "

" अजयपालाला सामोरा जा. अधिकउण्या उत्तराबद्दल त्याची क्षमा माग. त्याचं मांडलिकत्व कबूल कर....बाळा ! हें सांगतांना माझी जीभ लुळी पडते. शब्द घसा कातरीत बाहेर येतात. पण निरुपाय आहे. अजयपाल अतुर्बळी आहे. आसपासचे सगळे सामंत, गडकरी त्याचे पंक्षपाती आहेत. तुझ्या मदतीला मात्र कोणीहि नाहीं. म्हणून सांगतें—"

" आई ! मायेच्या पोटीं तूं हें बोलतेस, हें मला कळतं. पण बळिवंताचे पाय धरणं, हें क्षत्रियाला शोभेल का ? माझे पूर्वज स्वाभिमान राखून जगले; मी त्यांच्या वंशांत जन्मून त्यांच्या कीर्तीला काळिमा लावूं ? केवळ जगण्यासाठीं ? तूंच सांग आई ! "

तिला कांहीं बोलतां येईना. तिची जीभ घुटमळली. श्वास गुद मरला. मुक्तपणें ओघळले ते अश्रू. तिला स्वतःचींच लाज वाटली. ' काय हवं तें कर बाबा ' म्हणून ती तिथून दूर झाली.

पाठोपाठ कफ्फू चौहान बाहेर आला. शस्त्रागारांत जाऊन त्यानें चिलखत आणि शिरस्त्राण चढवलें. आपली यशदायिनी लखलखीत तलवार कमरेला लटकवली. तो वीरवेषानें सज्ज होऊन बुरुजावर आला. त्यानें रणशिंग फुंकायला लावलें. सगळे सैनिक तयार होते. घोडे खोगीर घालून. उभे होते. भालाइतांनीं भाले उचलले. धनुर्धारींनीं धनुष्यें चढवलीं. खड्गधारींनीं आपल्या तलवारी उपसल्या. 'शिव हरहर' ची प्रचंड गर्जना झाली. कफ्फूचें लहानसेंच; पण कसलेलें आणि जीवावर उदार होऊन लढणारें

स्वामिनिष्ठ सैन्यपथक गडाखालीं उतरूं लागलें. तिकडे अजयपाल तसा इकडे. कफ्फू चौहान आघाडीवर राहिला. गडाखालीं उतरून तो गंगापार झाला आणि त्यानें गंगेवरचे लांकडी सांकव मोडून खालीं घातलें. शत्रूला आंत घुसायला आणि आपले सैनिक कचदिल होऊन पळूं लागले तर त्यांना आंत शिरायला असलेली एकमेव वाट कफ्फू चौहानानें बंद करून टाकली. सिंहगडाच्या लढाईंत सूर्याजीनें दोर कापून टाकले होते तसें केलें.

आणि मग कफ्फूनें अजयपालाला आपल्या निधड्या छातीवर झेललें. घमसान युद्ध सुरू झालें. स्वाराला स्वार आणि वीराला वीर भिडला. कफ्फू चौहान म्हणजे काय चीज आहे, हें आजवर अजयपालाला प्रत्यक्ष पाहायला मिळाले नव्हतें. तें आज मिळालें. कफ्फू म्हणजे फुंफाटणारा नाग होता. कफ्फू म्हणजे हत्तींची गंडस्थळें फ़ोडणारा वनराज केसरी होता. कफ्फू म्हणजे आभाळांतून पडणारा विजेचा लोळ होता. सैन्यपथकांत घुसला, कीं आपल्या तलवारीनें तो आजूबाजूचें केरकसदळ एका घावांत साफ करी. पुन्हा मागें येई. पुन्हा दुप्पट जोरानें फळी फोडून आंत घुसे. अजयपाल नुसता त्याच्याकडे पहातच राहिला. कसा अडवावा, कसा रोखावा हें त्याला कळेचना. कफ्फू चौहान मुंडक्यामागून मुंडकीं उडवीत सुटला होता. रक्ताचीं कारजीं उफाळीत सुटला होता आणि अजयपाल हतबुद्ध होऊन नुसता बघत राहिला होता. ही होती कफ्फू चौहानची करामत! हा होता त्याचा भीमसेनी तडाखा!

पण अजयपाल थोड्याच वेळांत सांवरला. त्यानें आपल्या सैन्याची व्यूहरचना केली. आपल्या सैनिकांना त्यानें उत्तेजन दिलें आणि दमहि भरला. पण कफ्फू चौहानच्या त्या पहिल्या डुक्कर-मुसंडीनें अजयपालचे सैनिक जे घाबरले ते घाबरलेच. त्यांच्यांत जोमच उरला नाहीं. शत्रूचें तें सैन्य कफ्फू चौहानाला आणि त्याच्या सैनिकांना जणूं कुरणच ठरलें. हवे तसे हात मारावे. हवे तसे शत्रूचे लोक लोळवावे.

अजयपालाची खरोखरच दाणादाण झाली. पळणारे पळण्या-साठीं आणि मारणारे मारण्यासाठीं उग्र आरोळ्या देऊं लागले. सगळ्या आजूबाजूच्या टेकड्या आक्रोश आणि आरोळ्या यांनीं दुमदुमून गेल्या. रानींचीं श्वापदेंसुद्धा त्या आरोळ्यांनीं घाबरून सैरावैरा पळत सुटलीं. त्या आरोळ्या उपगडापर्यंत पोहोंचल्या. कफ्फू चौहानच्या आईच्याहि कानांत पडल्या. आधींच ती गर्भ-गळित झाली होती. तिचा धीर उत्पन्न होण्याच्या आधींच खचला होता. आणि आतां तर तिला वाटलें, कीं आपला पोरगा धारातीर्थीं पडला. आरडताहेत ओरडताहेत ते आपलेच सैनिक. संपलं पोराचं आयुष्य! गडाचंसुद्धा! अजयपाल दुष्ट आहे. तो सापाहून डंखी आहे. तो आतां विजयोन्मादानें गर्जत गडावर येईल. इथल्या उरल्यासुरल्या लोकांना कंठस्नान घालील. म्हाताऱ्यांची फरफट करील. तरण्या बायकांची अब्रू घेईल. हरतऱ्हांनीं आपला सूड उगवील.

आणि या काल्पनिक भयानें ग्रासलेल्या त्या म्हातारीनें आपल्या आणि इतर सर्वांच्या जिवावर उदार होऊन काय केलें ठाऊक

आहे ! गडाचें महाद्वार बंद करून घेतलें आणि गडाला चोहोंबाजूंनीं आग लावून दिली.

आगीला वाऱ्याची साथ मिळाली. तो वारा जरी गंगेच्या प्रवाहावर लोळून शीतल होऊन येत होता, तरी त्यानें त्या भडाग्नीला भलतेंच चेतवलें. भिंती धडाधड कोसळूं लागल्या. तुळया, वहालें मोडूं लागली. छपरें खचूं लागलीं. माणसें त्याच्या खालीं सांपडून जिवंतपणें जळूं लागलीं. सगळा हाहाकार माजला. त्या विकराल ज्वालांचा घोंघाट एवढा मोठा होता, कीं त्या आवाजापुढें माणसांचीं आक्रंदनें कःपदार्थ ठरलीं. तीं बाहेर कुणाला ऐकूंहि गेलीं नाहीत.

सगळें खाऊन पचवून आग विझली. सगळे आवाज थांबले. सगळे जीव थंड झाले. उरली ती केवळ राख ! लांकडांची, वस्त्रांची धान्याचीं आणि माणसांचीसुद्धा केवळ राख ! त्या म्हातारीनें केवळ कल्पनेच्या भयानें स्वहस्तें आपल्याच पायावर धोंडा पाडून घेतला होता. आत्मनाश, वास्तुनाश, राज्यनाश आणि सर्वस्वनाश करून घेतला होता.

शत्रुसैन्याला सैरावैरा पळायला लावून, अजयपालाला आपला पराक्रम पटवून आणि विजयाचा तुरा लावून आपल्या गडाची टेकडी चढणाऱ्या कफ्फू चौहानला तिथें काय दिसलें ? काय दिसणार ! दिसण्याजोगें कांहीं नव्हतेंच तिथें ! सगळे अग्निनारायणानें स्वाहा करून होत्याचें नव्हतें केलें होतें. त्याची म्हातारी आई गेली होती. त्याची तरुण पत्नी गेली होती. त्याची लाडकीं

गोजिरवाणीं मुलें गेलीं होतीं. महालमंदिरें, दासदासी सगळेंच खलास झालें होतें. कफ्फू चौहाननें कपाळावर हात मारून घेतला आणि तो मट्कन् खालीं बसला !

अजयपालाला हा वृत्तांत थोड्याच वेळांत कळला. कफ्फू चौहानचा पराभव केल्यावर उपगडावर जाऊन जें शतकृत्य तो स्वत: करणार होता, तें परभारें परस्परच झालें होतें. त्यामुळें त्याला परत जोर चढला. तो दिवाभीताप्रमाणें एका जाळींत लपून बसला होता, तो पुढें आला, त्यानें आपलें उरलें सुरलें सैन्य पुनश्च एकत्र केलें. तो त्यांना आवेशाच्या वाणीनें बोलला.

"वीर हो, कफ्फू चौहान आतां सर्वस्वाला नागवला आहे. कपाळ पिटीत हतवीर्य होऊन बसला आहे. त्याच्या अंगांत आतां मुंगीचंसुद्धा त्राण उरलेलं नसेल. आतां तो सहजपणें आपल्या हातीं लागेल. तुम्हांला आता डर नाहीं. तुम्ही उपगडाला वेढा घाला. आणि चहूंबाजूंनीं बेधडक वर चढा. कफ्फू कुठें तरी तुम्हांला हटकून गवसेल. चला. ही मोहीम फत्ते करा !"

अजयपालाच्या हुकुमाप्रमाणें गडाला वेढा पडला. चहूं बाजूंनीं त्याचे सैनिक कफ्फूला धुंडीत वर चढूं लागले. कफ्फू एका झुळझुळत्या झऱ्याकांठीं शिलाखंडावर बसला होता. त्याची मुद्रा म्लान झाली होती. डोळ्यांतलें तेज हरपलें होतें. बाहू ढिले पडले होते. तो आतां कफ्फू चौहान उरला नव्हता, केवळ हाडामांसाचा एक जड जीव, एवढेंच त्याचें अस्तित्व उरलें होतें. हृदयांतल्या चैतन्याचा अंगार विजला होता. उरला होता तो केवळ कोळसा ! पूर्वी

त्याच्या नुसत्या दर्शनानें शत्रूला चटके बसत होते, तिथें आ सगळाच थंडपणा, विळविळीतपणा आला होता. सैनिकांनीं त्याला पकडलें, बांधलें आणि अजयपालाच्या समोर नेऊन उभे केलें, तरी त्यानें लवमात्र धडपड केली नाहीं.

अजयपालाच्या अंगांत आतां सैतान संचारला. तो त्या बांधलेल्या सिंहापुढें छाती काढून उभा राहिला. त्यानें प्रथम कफ्फूची खूप निर्भर्त्सना केली. बळिवंताशीं वैर करणें म्हणजे विस्तवाशीं खेळणें आहे, असें त्याला शेलक्या शब्दांत पुन:पुन्हा बजावलें अन् शेवटीं म्हटलें.

" माझं मांडलिकत्व कबूल करुन झाल्या गोष्टीबद्दल माझी क्षमा मागत असशील, तर अजून मी तुझी मुक्तता करीन. तुला जीवदान देईन ! "

त्यावर कफ्फू नुसतें ओठांतल्या ओठांत हसला. त्या हसण्यांत कमालीचा कडवटपणा होता. अजयपालाचा तो बाववनकशी उपहास होता. त्या हसण्यानें अजयपालाला जणुं मुंगळे डसले. त्यानें तिथल्या तिथें थयथयाट केला. तो भृकुटी वक्र करून म्हणाला.

" अजून तूं हसतोस ! हस. पण हें तुझं हसणं अखेरचं ठरणार आहे, हें लक्षांत घे. अजून तुला संधि देतों. तूं माझं मांडलिकत्व स्वीकार आणि जगायला मोकळा हो ! "

त्यावर कफ्फू चौहान बोलला.

" जगायला मोकळा होऊं ? हुंः ! काय उरलं आहे जगण्याजोगं आतां माझ्या आयुष्यांत ? "

"तूं आहेस ना? मग सगळं आहे. गड जळाला तर पुन्हा उभारतां येईल. बागा उद्ध्वस्त झाल्या, तर तिथं नव्यानं लावणी करतां येईल. बायको गेली तर दुसरी आणतां येईल. फक्त मला एकदा मंडलेश्वर म्हण, कीं मी तुला पुनश्च सगळं उभारून देतों."

"मी तुझ्यासारखा उलट्या काळजाचा नाहीं."

"ठीक आहे. मग भोग आतां मरणाची शिक्षा."

कफ्फू चौहान आनंदानें त्या गोष्टीला तयार झाला. त्यानें खालीं वांकून जमिनीवरची थोडी माती उचलली आणि तोंडांत टाकली. मग तो ताठ उभा राहून म्हणाला.

"मी तयार आहें."

लगेच अजयपालानें इशारा केला. एक दांडगा धटिंगण आपली तलवार उपसून पुढें झाला. आपल्या खड्गाला आतां रक्त प्राशन करायला मिळणार म्हणून त्याला अगदीं हर्षाच्या गुदगुल्या होत होत्या. कांहींना तारण्यांत आनंद वाटतो, तर कांहींना मारण्यांत! तो तगडा जवान आणि अजयपाल हे दोघेहि दुसऱ्या जातींतले होते. कफ्फूला जिवें मारतांनाहि अजयपाल आपल्या अहंकाराचे लाड पुरवून घेणार होता. त्यानें त्या खड्गधारी सैनिकाला म्हटलें.

"हा मी कफ्फूच्या समोर अगदीं जवळ उभा राहातों. तूं त्याचं मस्तक अशा सफाईनं उडव, कीं तें धडावेगळं होतांच माझ्या पायावर पडलं पाहिजे. जिवंतपणीं नाहीं, तर मेल्यावर तरी कफ्फूचं मस्तक माझ्या पायाला टेकलं पाहिजे."

तो मारेकरी त्यावर छातीला हात लावून म्हणाला. 'तें माझं काम!' कफ्फू पुन्हा एकवार हसला. मृत्यु अगदीं अंगाला येऊन

मिळला असतांहि हसत त्याला कवटाळणारे जे कोणी वीर या जगांत झाले, त्यांच्या मालिकेंतला तो होता.



कफ्फू चौहानचें मुंडकें उडालें

मारेकऱ्यानें अस्तन्या सावरल्या, तलवार परजली आणि एक-दोनदा ती हवेंतच फिरवली. एवढ्यांत बाकीच्या कांहीं सैनिकांनीं कफ्फूला घट्ट आवळून धरलें आणि मारेकऱ्याचा घाव आपल्याला लागणार नाहीं अशा बेतानें ते उभे राहिले. पुन्हा एकदा अजयपालाचा इशारा झाला. आणि मारेकऱ्याच्या तलवारीचें पातें एका क्षणांत कफ्फूची मान कापून पलीकडे गेलें. कफ्फूचें मुंडकें उडलें. पण—

तें अजयपालाच्या पायावर न पडतां थेट त्याच्या डोक्यावर जाऊन आदळलें!

अजयपाल आश्चर्यचकित झाला. जडमूढ बनला. त्यानें चेहरा पाडला अन् मान खालीं घातली. त्याचा जय होऊनहि तो परा-

जित झाला. कफ्फू चौहान मरूनहि त्याच्या पायां पडला नव्हता. इतकेंच काय; पण तो त्याच्या डोक्यावर बसला होता. मंडलेश्वर तो ठरला होता अन् मांडलिक बनला होता तो अजयपाल!

भेरी, दुंदुभि न वाजवतां अजयपाल परत गेला अन् चोरासारखा आपल्या गढींत शिरला.

या लढाईची अन् या तिच्या शेवटाची हकीगत ऐकून हिमाचलांतले लोक म्हणूं लागले.

" जगावं तर असं जगावं अन् मरावं तर तेंहि असं मरावं!"



# चारणकन्या

सकाळची वेळ होती. दोन घटका दिवस आला होता. आकाश निरभ्र होतें. अगदीं चक्क निळें अन् नितळ. सूर्यनारायण उमाठ्यावर आला तो मुळीं जळत तापतच आला होता. चहूं दिशांनीं वारे आडवे तिडवे घोंघावत होते. सगळीकडून धुरळा उडत होता. तांबूस धुळीचा एक पातळसा थर वातावरणांत तरंगत राहिला होता. जिकडे पहावें तिकडे उजाड दिसत होतें. झाडांना पान नव्हतें. जमिनीवर तण नव्हतें. तळीं कोरडीं होतीं. विहिरी आटून त्यांत बेडूक ओरडत होते.

आणि अशा या अवस्थेंत दोन माणसें अन् वीसपंचवीस गुरें पोरबंदरची राजधानी सोडून रानाच्या वाटेला लागलीं होतीं. पुरुषाचें नांव अमरा. तो जातीचा चारण होता. गुरें पाळणें हा त्याचा पिढीजात धंदा होता. केस पिकले होते, त्यावरून त्याची पन्नाशी जवळ आली आहे, असें वाटत होतें. डोळे खोल गेले होते, हाडांवर मांस उरलें नव्हतें, त्यावरून तो बरेच दिवस अन्नाला महाग झाला असल्याची कल्पना येत होती. तो सर्वांत पुढें होता. त्याच्या मागून होता गुरांचा कळप. त्यांत गाई होत्या, बैल होते, अन् लहान लहान वासरेंहि होती. त्यांचींहि पोटें खपाटीं गेलीं होतीं अन् चालतांना तंगड्या तिठून पडत होत्या. त्यांचीहि

बरेच दिवस उपासमार झाल्याचें स्पष्ट दिसत होतें. आणि या सर्व गुरांच्या मागून एका तांबूस बाळ्या वासराला हळूहळू पुढें ढकलीत चालत होती एक अठरा वर्षांची मुलगी !

ती होती अमरा चारणाची कन्या. त्याचा एकुलता एक मायापाश. तिचें नांव ऊजली. ती अंगाबांध्यानें उफाड्याची होती. सर्वांगी सुंदर अन् निर्दोष. मासोळ्यांसारखे डोळे; पण काळेभोर अन् टप्पोरे. त्या डोळ्यांत एक विलक्षण चमक होती. एखाद्याला वाटावें, कीं ती आपल्याकडे नुसतीच पहात नाहीं, तर पहाण्यानें आपल्या काळजांत घुसते आहे. कपाळपट्टी रुंद. हनुवटी घाटदार. ओठाच्या पाकळ्या कशा आरक्त अन् विलोभनीय. नाक उभारीचें अन् केसांचा अंबाडा गोऱ्या मानेला न झेपणारा. तिच्याकडे पहाणाराला असें वाटे, कीं ही मुलगी विलक्षण करारी अन् तेजस्वी असली पाहिजे. ती जणूं मुलीचा आकार घेऊन धरित्रीवर उतरलेली आभाळांतली सळसळती वीजच ! अमराच्या मानानें ती विशेषशी रोडली नव्हती. त्यावरून कळत होतें, कीं बापानें आपल्या लाडक्या लेकीला भुकेची बाधा होऊं दिली नाहीं.

राज्यांत अवर्षण पडलें, अन्न पाणी मिळेनासें झालें, गुरावासरांचे अन् माणसांचेसुद्धा जीव जमणें अशक्य झालें म्हणून हीं माणसें राजधानीला रामराम ठोकून वाट फुटेल तिकडे चाललीं होतीं. कितीहि लांब जावें लागलें तरी हरकत नाहीं; पण जिथें पाण्याचा आसरा असेल, जिथें गुरांना ओला चारा गवसेल, तिथें जाऊन रहायचें आणि सर्वांचे जीव जगवायचे अशा बेतानें अमरा चारण घरदार सोडून बाहेर पडला होता.

अमराच नव्हे; तर राज्यांतलीं अशीं कितीतरी कुटुंबें देशोधडीला लागलीं होतीं. दोन वर्षे पावसाचा एक थेंब पडला नाहीं, तर माणसांनीं खायचें काय अन् जगायचें कसें! सकाळ झाली कीं बाडबिस्तरा कवळून माणसांचे घोळकेच्या घोळके राजधानी सोडून परदेशी होत आहेत, हेंच दृश्य अलीकडे रोज दिसायचें. असें होतां होतां अर्धेअधिक शहर थोडक्याच दिवसांत उजाड झालें. गल्लीबोळांतून शिरावें तर सगळ्या घरांचीं दारें लागलेलीं. माणसाचा पायरव नाहीं, कीं विस्तवाचा धूर नाहीं.

हालामण हा पोरबंदरचा राजा. तो उदार होता अन् प्रजापालकहि होता. आपल्या राजधानीला दिवसेंदिवस अवकळा येत आहे हें तो उघड्या डोळ्यांनीं पहात होता. पण तो तरी काय करणार! आभाळांतला राजा कोपला, तिथें धरतीवरचा राजा काय करील! पाऊस पडावा म्हणून त्यानें खूप देवधर्म केले, देवळांतल्या देवांवर संततधार अभिषेक चालवले, अनुष्ठानें सुरू केलीं, सगळें कांहीं केलें. पण मेघराजाला कांहीं दयेचा द्रव आला नाहीं. राजाला वाटलें, कीं आणखी एक वर्ष पाऊस पडला नाहीं, तर जी गत प्रजाजनांची, तीच आपलीहि होणार. आपल्यालाहि राज्यत्याग करून अन्नासाठीं देशांतराला जावें लागणार. मग कुठलें सिंहासन आणि कुठलीं छत्रचामरें!

एक दिवस तो असाच चिंताग्रस्त अवस्थेंत बसला असतांना त्याचा प्रधान त्याच्याकडे आला. शिष्टाचाराप्रमाणें त्यानें राजाला नमस्कार करून क्षेमकुशल विचारलें. त्यावर राजा सुस्कारा सोडून म्हणाला,

" प्रधानजी, राज्याची स्थिति तुम्ही पाहतांच आहां. सगळीकडे धूळच धूळ! पावसाचा टिपूस नाहीं. दिवसभर कढत कढत वाफारे अन् धुळीच्याच वावटळी! अशा स्थितींत कसलं क्षेम अन् कसलं कुशल—"

त्यावर प्रधान बोलला.

" महाराज, मला तें दिसतं आहे. मीहि त्याच चिंतेंत आहें. राज्यावर मोठी आफत आली आहे आणि ती आपल्या नगरांतल्या बड्या व्यापाऱ्यांनीं आणली आहे."

" व्यापाऱ्यांनीं? ती कशी काय? त्यांना पाऊस नको?"

" नको! त्यांना पाऊस नको; पैसा हवा आहे. त्यांच्या वखारी धान्यानं भरलेल्या आहेत. आजच त्यांनीं धान्याचे भाव दसपटीनें वाढवले आहेत. अजून कांहीं दिवस पाऊस पडला नाहीं, तर त्यांना आणखी भाव चढवतां येतील. दहापटीचे वीसपट करतां येतील. त्यांची धान्याचीं पोतीं रुपयांनीं भरतील. म्हणून त्यांनीं पाऊस अडवून ठेवला आहे."

" तो कसा काय?"

" आपल्या राज्याला लागून जें मोठं अरण्य आहे, त्यांत एक देवऋषि रहातो. तो महाचेटकी आहे. या व्यापाऱ्यांनीं त्याच्याकडून पाऊस पडूं नये म्हणून चेटूक करवलं आहे. त्याला भली मोठी दक्षिणा दिली आहे."

" सांगतां काय तुम्ही हें? व्यापारी लोक इतके पाषाणहृदयी केव्हांपासून झाले? माणसं भुकेनं मरतात, देशोधडीला लागतात,

याचं त्यांना कांहींच का वाटत नाहीं? तसं असेल तर त्यांना कडक शिक्षा केली पाहिजे."

"त्यांना शिक्षा मागाहून. पण आधीं तें चेटुक? तें नाहींसं करायला हवं."

"सांगा प्रधानजी! कुठं आहे तें चेटुक? मी आत्तांच्या आत्तां जाऊन त्याची वासलात लावतों."

"त्या देवऋषीनं तें एका कागदावर लिहून काळ्या हरणाच्या शिंगाला बांधलं आहे. तो काळवीट रानांत इकडे तिकडे मोकाट हिंडतो. अनेकांनीं त्याला पाहिलं आहे. आणि त्याच्या शिंगावरचा तो कागदहि पाहिला आहे. जोंवर तो हरिण जिवंत आहे अन् तो कागद शाबूत आहे, तोंवर राज्यांत पाऊस पडायचा नाहीं."



राजा हरणाची शिकार करतो

हालामण राजा तें ऐकून भयंकर खवळला. मागचा पुढचा कांहींहि विचार न करतां तो घोड्यावर स्वार होऊन एकटाच जंगलांत दौडला. हिंडतां हिंडतां त्याला तो काळवीट दिसला. तो

अगदीं काळाकुळकुळीत होता अन् त्याच्या शिंगाला तो कागदहि होता. राजानें ताबडतोब नेम धरून त्याच्यावर एक तीक्ष्ण बाण सोडला. पण तें जनावर मोठें चलाख होतें. त्याला राजाची चाहूल लागली अन् त्याच्या धनुष्याला बाण लागायच्या आंतच तें चौखूर उसळलें. असें वाटावें कीं जणूं वाऱ्यानेंच हरणाचें रूप घेतलें आहे.

पण राजाचा घोडाहि कांहीं कमी तेज नव्हता. तोहि जणूं श्यामकर्ण वारूच्याच वंशांतला होता. राजानें त्याला 'चल बेटा' म्हणायचा अवकाश; त्यानेंहि दौड सुरू केली. हरिण पुढें अन् घोडा मागें. पण किती झालें तरी तो हरिण होता अन् शिवाय जिवाच्या आकांतानें पळत होता. राजाला तो मधूनच दिसे; पण ताबडतोब आडवा रानात घुसे. पुन्हा दिसे; पुन्हा अदृश्य होई. पण तरीहि राजानें त्याची पाठ सोडली नाहीं. राजा त्याच्या मागून कोसा-मागून कोस दौडला. पण तरीहि तो काळवीट कांहीं त्याच्या बाणाच्या टप्प्यांत आला नाहीं. अखेर दिवस मावळायची वेळ आली अन् मग राजा निराश झाला. तोहि दमला अन् त्याच्या घोड्याच्याहि तोंडांतून फेस निघाला.

एवढें झालें तरी राजाचें दैव बलवत्तर होतें. पळतां पळतां अखेर त्या काळवीटाचीहि दमणूक झाली होती. त्याच्या बारक्या पायांतली ताकद खलास झाली होती अन् शरीरांतला सांधान् सांधा खिळखिळा झाला होता. आतां आपण मृत्यूच्या तावडींतून सुटलों, अशा कल्पनेनें तो झाडाखाली गळाठून उभा राहिला होता. मंद गतीनें का होईना; पण राजा त्याचा पाठलाग करीत नेमका तिथें पोचला.

एकाच बाणानें त्यानें त्या काळविटाचें काम खलास केलें. पश्चिमेला सूर्य मावळतांना इकडे त्या काळविटाचाहि प्राण मावळला. राजाच्या आनंदाला पारावार उरला नाहीं.

तो लगेच घोड्यावरून उतरला. हरणाजवळ जाऊन त्यानें त्याच्या शिंगावरचा तो कागद काढला. त्यावर एक कोष्टक होतें अन् त्यांत कांहीं आंकडे अन् कसलीं तरी चमत्कारिक अक्षरें होतीं. हालामण राजाला त्याचा कांहीं अर्थ कळला नाहीं. अवर्षणाचें अन् दुष्काळाचें मूळ असलेला तो कागद त्यानें ताबडतोब जाळून टाकला अन् परत राजधानींत येण्यासाठीं तो पुनश्च घोड्यावर स्वार झाला.

पण तो चार पावलें गेला नसेल, एवढ्यांत आकाशांत 'गुडुम्' असा आवाज झाला. प्रचंड वारा सुटला. बोलबोल म्हणतां चहूंकडून अभाळांत ढग जमा झाले. काळेकुट्ट अन् पाण्यानें भरलेले. त्यांतून विजाहि लखलखूं लागल्या. आकाश जणूं ओथंबून आलें. अन् लगेच पावसाला सुरवात! प्रथम आंवळ्याएवढे टपोरे थेंब अन् मागाहून मुसळधार!

पावसाच्या आडव्या तिडव्या धारा सपासप राजाच्या तोंडावर आदळूं लागल्या. राजा दिवसभरचा उपाशी! त्यांतून रपेट करून थकलेला. अन् त्यांतच हा जोरदार पावसाचा मारा. राजाला तें सहन झालें नाहीं. त्याला एकाएकीं मूर्च्छा आली. तो एकदम घोड्याच्या पाठीवर पडला अन् अस्ताव्यस्त लोंबकळूं लागला. एवढ्यांत रात्र पडली. वरून पावसाची धूमधार अन् सभोंवतीं

काळा काळा अंधार! हाकेटाकेंत कोणी माणूस नाहीं अन् राजाची दशा ही!


पण त्याचा घोडा शहाणा होता. त्याला कळलें, कीं आपला धनी सावध नाहीं. अन् त्याला कुठेंतरी माणसाच्या लगत्याला नेऊन घातला पाहिजे. तो मोनजातीचा प्राणी आपल्या धन्याला सांभाळीत सावरीत त्या किर्र रानांतून वाट काढूं लागला. थोड्या अंतरावर त्याला एक झोपडी दिसली. तिथें माणसाचें अस्तित्व आहे हें त्यानें जाणलें. तो त्या झोपडीच्या दारांत आला. अन् मोठ्यानें खिंकाळला. एका खिंकाळण्याला कोणी दाद दिली नाहीं म्हणून पुन्हा खिंकाळला.

मग मात्र त्याचा हेतु सफल झाला. झोपडीचें दार किलकिलें झालें. एक व्यक्ति हळूहळू दबकत दबकत बाहेर आली. अजूनहि पाऊस कोसळत होता. अंधार तर घनदाट होताच. त्या व्यक्तीला वाटलें, कीं कोणीतरी चुकलेला वाटसरू असावा अथवा चोरदरोडेखोरहि असणें शक्य आहे. म्हणून तो स्तब्ध उभा राहून कानोसा घेऊं लागला. पण माणसाचा शब्दच येईना. घोडा मात्र उभा आहे अन् फुरफुरतो आहे.

कोण होता तो झोपडीवाला माणूस? तो होता अमरा चारण! पोरबंदरच्या राजधानींतून गुरें वासरें अन् आपली एकुलती एक मुलगी ऊजली यांना घेऊन बाहेर पडलेला. या रानांत त्यानें आपली झोपडी उभारली होती अन् तोच आतां बाहेर आला होता. अंधारांत कांहीं दिसत नाहीं असें पाहून त्यानें मुलीला हाक मारली.

"बेटा! दिवा घेऊन जरा बाहेर ये."

त्या हांकेसरशीं ऊजली हातांत एक पणती घेऊन बाहेर आली. त्या प्रकाशांत अमराला दिसलें, कीं घोड्याच्या पाठीवर एक स्वार लोंबकळतो आहे. हा कांहींतरी विचित्र प्रकार आहे या कल्पनेनें त्याचें ऊर धडधडूं लागलें. पण ऊजली म्हणाली, कीं 'बाबा, बघा ना पुढें जाऊन कोण आहे तें!' अमरानें मग धीर केला. तो जवळ जाऊन हात लावून पहातो तर काय! सगळें थंड!



बेशुद्ध राजा अमराच्या झोपडीपुढें

त्यानें ऊजलीला पुढें बोलावलें. दोघांनीं मग त्या स्वाराला घोड्यावरून खालीं घेतलें अन् तसेंच झोपडींत आणलें. तिथें एकुलती एक खाट होती त्यावर त्याला आडवें ठेवलें. पण तो दुर्दैवी माणूस कांहींच हालचाल करीना. अमरानें त्याचें सर्वांग

चांचपून पाहिलें; पण तें काल्यासारखें गार! त्याच्या जिवंतपणाचें लक्षण म्हणजे मंद निर्जीव असा श्वासोच्छ्वास! तोहि अमरानें त्याच्या नाकाशीं कान नेला तेव्हांच त्याला जाणवला. ऊजली तिथेंच श्वास रोधून उभी होती. तिला त्यानें म्हटलें.

" बेटा, आपल्यावर मोठी आफत आली. हा दुर्दैवी माणूस कोण आहे देव जाणे! याचं लक्षण कांहीं ठीक दिसत नाहीं. हा जर आपल्या झोपडींत मेला, तर आपल्या गृहस्थीला कलंक लागेल."

" जगणं मरणं कोणाच्या हातचं आहे बाबा? सटवीनं त्याच्या कपाळीं जें लिहिलं असेल, तें घडणार." ऊजली म्हणाली.

"तें खरं; पण आपल्या कर्तव्यांत कसूर होतां कामा नये. याच्या अंगाला ऊब दिली तर हा जगेल असं मला वाटतं. पण कशानं ऊब आणायची? आपल्या झोपडींत तर आंथरापांघरायला चिंधीसुद्धा नाहीं. शेकोटी करायची म्हटलं तर काटकीसुद्धा नाहीं." अमरानें हताश होऊन एक दीर्घ सुस्कारा सोडला. ऊजलीच्या डोळ्यांत तर पाणीच आलें.

कांहीं क्षण थांबून अमरा आपल्या मुलीला बोलला.

" आतां या प्राण्याला जगवणं केवळ तुझ्या हातीं आहे."

"तें कसं काय बाबा?"

" तूं तरुण आहेस. तुझ्या अंगांत भरपूर ऊब आहे. तूं याला घट्ट कवटाळून धर. तसं केलंस म्हणजे तुझी उष्णता याला मिळेल अन् हा सावध होईल, याच्या प्राणरक्षणासाठीं एवढा एकच उपाय मला दिसतो."

ऊजलीनें बापाचें बोलणें ऐकलें अन् ती एकदम स्तंभित झाली. एका पवित्र कुमारिकेनें लग्न होण्यापूर्वी एखाद्या पुरुषाला वक्ष कवटाळणें हें केवढें भयंकर पाप! अन् ऊजलीचा बाप तिला तेंच करायला सांगत होता. ती जेव्हां कांहींच बोलेना, कसलीच हालचाल करीना, तेव्हां अमरा पुन्हां तिला म्हणाला.

" बेटा! संशयांत पडूं नको. मरणोन्मुख अतिथीला जीवदान देणं हा परम धर्म आहे. त्या धर्माला तूं जाग "

असें बोलून अमरा त्या झोपडींतून बाहेर निघून गेला.

आतां ऊजली सावध झाली. तिच्यावर प्रसंग बिकट होता हें खरें; पण तिनें मनाचा निर्धार केला. हालामण राजा ज्या खाटेवर निश्चेष्ट पडला होता, त्या खाटेला तिनें सात प्रदक्षिणा घातल्या. मग नमस्कार केला. या कृत्यानें तिनें मरणाच्या दारीं पडलेल्या त्या अनोळखी पुरुषाशीं मनोमन लग्न लावलें. ती त्याची पत्नी बनली. मग ती आपलें सौभाग्य परत सजीव करण्यासाठीं त्या राजाला कव घालून झोपली. रात्रभर तिला झोप लागली नाहीं अन् राजानेंहि कसलीच हालचाल केली नाहीं.

सकाळीं दिशा उजळल्या आणि राजाच्या शरीरांत प्राण संचरला. त्याचे गार पडलेले हातपाय पुनश्च गरम झाले आणि त्यानें डोळे उघडले. ऊजलीनें जणूं आपल्या पतीला पुनर्जन्म दिला. मुसळाला अंकुर फोडले. आपण एका झोपडींत खाटेवर पडलों आहों आणि आपल्या शेजारीं एक तरुण मुलगी आहे, हें पाहून राजाला परम आश्चर्य वाटलें. तो उठून बसायच्या आधींच

ऊजली त्याच्यापासून दूर झाली आणि झटकन् तिनें आपलें वस्त्र सांवरून विनय राखला.

"तूं कोण आहेस? अन् हा काय प्रकार आहे?" राजानें विचारलें.

ऊजलीनें लाजत, संकोचत त्याला रात्रींची सर्व हकीगत सांगितली. राजा आश्चर्यांत पडला. त्याला आदल्या दिवशींच्या सर्व घटना एकामागून एक आठवल्या. त्याला ऊजलीचे परम उपकार वाटले. "तुझ्या अलौकिक सेवेमुळें मी जगलों' म्हणून त्यानें तिचा गौरव केला. आपण पोरबंदरचे राजे असल्याबद्दलहि त्यानें तिला सांगितलें. त्यावर ऊजली म्हणाली.

"महाराज, आपण राजे आहांत, हें या क्षणीं मला कळलं. गेल्या रात्रीं आपल्या घोड्यानें जेव्हां आपणाला इथें आणून घातलं तेव्हां आपण माझ्या वाट्याला एक अनोळखे अतिथि होतां. आपला जीव जगवण्याचा प्रयत्न म्हणून माझ्या वडिलांनीं मला हा उपाय सांगितला. हा उपाय आचरल्यानें माझं कुंवारपण नष्ट होणार होतं. म्हणून मी ईश्वराच्या साक्षीनं आपल्याला पति मानलं आणि आपली पत्नी या नात्यानं आपल्याला जवळ केलं. तेव्हां यापुढें पत्नी म्हणून आपण माझा स्वीकार करावा आणि निरंतर आपली चरणसेवा करण्याचं भाग्य मला द्यावं. आपण राजे आहां, म्हणून वैभवाच्या लोभानं मी हें सांगत नाहीं. आपण भिकारी असतां तरीहि मी आपल्यामागून आलें असतें."

ऊजलीचें तें बोलणें ऐकून राजाच्या आश्चर्याला पारावर उरला नाहीं. आपले प्राण वांचले खरे; पण त्याचबरोबर आपल्यावर

दुसरी एक महान् आफत ओढवली. आपण आगींतून उठलों, पण फुफाट्यांत पडलों, असें त्याला वाटलें. ही बोलून चालून क्षुद्र चारणकन्या! अन् आपण क्षत्रिय राजे! आपला विवाहसंबंध म्हणजे शालजोडीला गोधडीचें ठिगळ. ही पोरगी भावनेनं बोलत आहे. प्रामाणिक असेल; पण वेडी आहे. आपण एका राज्याचे राजे आहों. आपल्याला असें वेडेंखुळें होऊन चालणार नाहीं. ज्या कांहीं गोष्टी करावयाच्या त्या विचारपूर्वकच केल्या पाहिजेत. या मुलीचे आपल्यावर अमाप उपकार आहेत हें खरें; पण त्यांची फेड निराळ्या मार्गानें आपल्याला करतां येईल......'

पण तरीहि ऊजलीचा धिकार करण्याचा त्याला धीर झाला नाहीं. 'मी राज्यांत गेल्यावर तुला बोलावणं धाडीन' असें तिला थातुर मातुर बोलून राजा तिथून निघाला. ऊजलीनें त्याला निरोप दिला तो डबडबलेल्या डोळ्यांनीं. त्याला सोडतांना तिला फार दुःख झालें होतें.

ती मग आपल्या झोपडींत राजाच्या बोलावण्याची वाट पहात राहिली. तिचा दिवस जातां जात नव्हता. रोज रात्रीं स्वप्नांत तिला राजाचें दर्शन होत होतें. ती त्याच्या पायां पडत होती. आपल्याला घेऊन चला, म्हणून त्याला विनवीत होती. पण दिवसामागून दिवस गेले अन् महिन्यामागून महिने पार झाले, तरी स्वप्नांतला राजा तिला प्रत्यक्षांत दिसला नाहीं. त्याच्याकडून कोणी माणूसहि आला नाहीं. तिच्या सहनशीतलतेचा त्यानें अंतच पाहिला.

मग ती आपल्या बापाला म्हणाली, कीं 'आपण पोरबंदरला जाऊं या.' अमरानें तें कबूल केलें. तीं दोघें एक सकाळीं झोपडीचें

कवाड लावून पोरबंदरच्या वाटेला लागलीं. अमरा सचिंत होता; पण ऊजली आपल्या पतीच्या सहवासाचीं गोड गोड स्वप्नें मनांत खेळवीत मार्ग चालत होती. त्या नादांत वाटचालीचे मुलींसुद्धा तिला श्रम झाले नाहीत.

तीं दोघे राजवाड्याच्या महाद्वारांत जाऊन ठेपलीं. ऊजलीनें आंत वर्दी पाठवली, कीं 'तुमची पत्नी राजद्वारांत येऊन तिष्ठत उभी आहे. पण त्या वर्दीचा कांहीं उपयोग झाला नाहीं. कोणी तिची दखलच घेतली नाहीं. जो तो म्हणे कीं 'हट जा! चालती हो इथून!'

पण ऊजली कांहीं अशी सुखासुखी जाण्यासाठी तिथें आली नव्हती. तिला आणखी कोणाचा आधार नसला तरी सत्याचा होता. आणि तें प्रस्थापित करायला लागणारें मनोधैर्य तिच्या अंगीं बळकट होतें. ती कोणी 'घररिघी' नव्हती किंवा चोर नव्हती. मरणाच्या दारीं पडलेल्या राजाला पति म्हणून तिनें जवळ केलें होतें. ती कां म्हणून हा अपमान सहन करील!

तिनें म्हटलें, कीं 'महाराज! तुम्ही माझी दखल घेत नाही ना? ठीक आहे. मी तुमच्या महाद्वारांत अन्नपाणी न घेतां धरणं धरीन अन् तरीहि तुम्हाला दया आली नाहीं तर इथंच प्राण सोडीन.'

आणि ती प्राणांतिक उपवासाचा निर्धार करून तिथें बसून राहिली. एक दिवस गेला, दुसरा मावळला, तिसरा संपत आला तरी ऊजली आपली तिथेंच. शरीर खंगलें; पण मुद्रा तेजःपुंज.

साऱ्या नगरांत बोभाटा झाला. ज्याच्या त्याच्या तोंडीं ऊजलीची चर्चा! राजा तीन दिवस वाड्याच्या बाहेर पडला नाहीं. पण तो आंतल्या आंत अस्वस्थ झाला. अखेर त्यानें ऊजलीला आंत बोलावलें. राजा तिला बोलला.

"काय हवंय तुला?"

"दुसरं कांहीं नको. तुमचे चरण हवे!"

"हें पहा ऊजली! मला भीड घालूं नको. तुझे उपकार मी स्मरतों. पण—"

"महाराज, मी आपल्यावर उपकार केलेच नाहींत. मी फक्त पत्नीचं कर्तव्य केलं."

"नाहीं. हें शक्य नाहीं. तूं माझ्याशीं पत्नीचं नातं जोडूं नकोस. तुझी माझी जातकुळी वेगळी आहे. तूं राजाची पत्नी होऊं शकणार नाहींस. मला त्या गोष्टीमुळें लांछन लागेल. आपण बहीणभाऊ म्हणून एकमेकांवर प्रेम करूं."

"महाराज, मी ईश्वराच्या साक्षीनं आपल्याला वरलं आहे. मी आतां आपली बहीण होणं शक्य नाहीं. झालें तर अर्धांगीच होईन."

"कशाला असा हटवादीपणा करतेस? एखादा सुंदर, सद्गुणी चारण जातीचा मुलगा मी तुझ्यासाठीं हुडकून आणीन."

"तो माझा भाऊ ठरेल!"

"असं कां म्हणतेस? तुला राजवैभवाचीच इच्छा आहे ना? मी त्याला माझं अर्ध राज्य देईन आणि अशा रीतीनं तुला राणी बनवीन."

" आपण मला ओळखलं नाहीं महाराज ! मला वैभवाची तिळमात्र आकांक्षा नाहीं. आपली पत्नी म्हणून मी या राजवाड्यांतल्या गोठ्यांतसुद्धा राहीन अन् शिळं पाकं खाऊन आनंद मानीन. "

" ऊजली ! तुला अखेरचं सांगतों. मलल्या ईर्षेला पेटूं नकोस. मी तुला पत्नी म्हणूग या राजवाड्यांत कालत्रयीं घेणार नाहीं. "

" ठीक आहे, नका घेऊं. मीहि कांहीं भीक मागायला आलें नाहीं आपल्याकडे. "

" जा तर मग ! उगाच माझं डोकं तापवूं नको."

" जातें. ही निघालेंच. पण आपण एक गोष्ट लक्षांत ठेवा. प्रेमाला जात आडवी येत नाहीं. येतां कामा नये. कारण प्रेम—आत्मसमर्पण करून केलेलं प्रेम—ही दैवी वस्तु आहे. जात बनवली आहे माणसानं. माझ्या भावना आपण जाणल्या असत्या, तर जातीचा बागुलबुवा माझ्यापुढें उभा केला नसता. आपण माझा धिक्कार केलात तरी मी मात्र आपली मूर्ति हृदयांत सांठवून घेऊन इथून जाईन. कुठें जाईन ठाऊक आहे ?"

" कुठेंहि जा !"

" कुठेंहि नाहीं जाणार ! आतां जगण्याचं कारण संपलं. या राजवाड्याच्या मागें अथांग आणि अपार असा निळा दरिया उफाळतो आहे. मी त्या समुद्रांत शिरेन. पाण्यांत आग उत्पन्न करीन आणि त्या आगींत जळून भस्म होईन. पति जिवंत असतांना सती जाईन. माझ्या सत्त्वाची परीक्षा पहाणार असाल तर, राजवाड्याच्या गच्चीवर उभे राहून पहा."

" मेलीस तर तूं सुटलीस अन् मीहि सुटलों असंच मी म्हणेन."

" मी तर मरणारच आहें. जळून जाणार आहें. पण आपल्या-बरोबर संसारसुख उपभोगण्याची आकांक्षा मीं सोडली नाहीं. माझ्या पाठोपाठ आपल्यालाहि यावं लागेल. अवघ्या तीन दिवसांनीं. ही तीन दिवसांची मुदत केवळ आपल्याला सगळी निरवानिरव करण्यासाठीं देत आहें. तीन दिवसांनीं आपल्या शरीरांत एकाएकीं आग उठेल. कुठलाहि धन्वंतरी आणलात, तरी ती शमायची नाहीं.



ऊजली समुद्रांत शिरते

त्या आगींत होरपळण्याच्या आंत आपला आत्मा शरीरांतून बाहेर पडेल. आपण स्वर्गात याल. आपल्या नव्हे, तर माझ्या पुण्याईनें याल. माझी इच्छा म्हणून आपल्याला यावं लागेल. मग तिथें

जात नाहीं अन् पात नाहीं. दोघंहि आपण दिव्य देह घेऊं अन् स्वर्गसुखाची लयलूट करूं. मी आपल्या चरणांची दासी अन् आपण माझे परमेश्वर!..."

आणि ऊजली तेथून विजेसारखी सळसळत निघाली. अमरा चारण तिच्या मागून धावत सुटला. 'बेटा, असं करूं नको· बापाला सोडून जाऊं नको!' असा त्यानें आक्रोश सुरू केला.

पण ऊजली आतां कोणाचीच उरली नव्हती. तिनें या जगांतले सारे लागेबांधे एका क्षणांत तट्कन् तोडून टाकले होते. ती किनाऱ्यावर पोंचली. वाळू तुडवीत पाण्यांत उतरली. कांठावर आदळलेल्या लाटेनें प्रथम तिच्या पायांना स्पर्श केला. बाकीच्या लाटा दुभंगून दोन्ही बाजूंना मार्गे हटल्या. ऊजलीसाठीं समुद्रांत रस्ता तयार झाला. ती सुसाट चालूं लागली. जातां जातां बरीच आंत पोंचली. मग एकदम समुद्रांत आग भडकली. सतीच्या प्रभावानें पाणीच पेटलें. चार दोन क्षणांतच ती आग भडकून शमलीसुद्धा. ऊजलीच्या तरुण, सुंदर अन् पवित्र देहाची तीन चिमट्या रांख फेसाळत्या लाटांनीं समुद्रकिनाऱ्यावर पसरून आपलें काम पुरें केलें.

हालामण राजानें आपल्या राजवाड्याच्या गच्चीवरून हा प्रकार पाहिला. त्याला ऊजलीच्या सतीत्वाची अन् दिव्य प्रेमाची साक्ष पटली. पावसानें डोंगर पाझरूं लागावा, तसा तो राजा डोळ्यांवाटें पाझरूं लागला. तो गच्चीवरून खालीं उतरला आणि आपल्या महालांत गेला. पण त्याच्या मनाची सुख-शांति बिघडली ती कायमचीच!

आणि तिसऱ्याच दिवशीं राजाचें शरीर एकदम तापलें. त्याचा ताप वाढला तो कल्पनेच्या बाहेर. तो ' आग, आग ' करीत तळमळूं लागला. पाण्याबाहेर काढलेल्या माशासारखी त्याची तडफड सुरू झाली. धन्वंतरी आले, उपचार सुरू झाले; पण कांहीं उपयोग झाला नाहीं. राज्याची निरवानिरव करण्याइतकाहि त्याला वेळ मिळाला नाहीं. ' ऊजली ! महासती ऊजली ! ' अशा हाका मारीत त्यानें थोडयाच वेळांत प्राण सोडला. त्या साध्वीचे शब्द खरे झाले. सतीचें सामर्थ्य काय तें पुन्हा एकदा जगाला पटलें !



# चक्रवेण

चैत्र महिना नुकताच लागला होता. घरीं दारीं वसंत बहरला होता. सोनचांफे दरवळले होते. मोगरीचे ताटवे फुलले होते. ओलसर जागीं भुईचाफीं भूमींतून वर आलीं होतीं. वाऱ्याचा स्पर्श सुखदायक झाला होता. तुळशीवृंदावनांत गळत्या लागल्या होत्या. चैत्रांगणें सारवून त्यावर रांगोळ्या काढल्या जात होत्या. गौरीचे दोल्हारे बसले होते. घरोघरीं हळदीकुंकुवाचे समारंभ चालू झाले होते. चौथ्या प्रहरीं नगरांतल्या सुवासिनी नटूनथटून थव्याथव्यांनीं हळदीकुंकवासाठीं जात होत्या आणि भरल्या ओट्यांनीं परत येत होत्या.

आणि आज राजवाड्यांतलें हळदीकुंकू होतें. नगरांतल्या प्रमुख प्रमुख घरीं खासगींतून त्याचीं निमंत्रणें गेलीं होतीं. सरदारांच्या, सावकारांच्या, व्यापाऱ्यांच्या आणि अधिकाऱ्यांच्या पुरंध्री चारी रस्त्यांनीं राजवाड्याकडे निघाल्या होत्या. बहुतेक सर्व घोड्याच्या गाडींतूनच आल्या होत्या. सगळ्यांच्या अंगाखांद्यावर सोन्यामोत्यांचे, हिऱ्यामाणकांचे अलंकार नुसते लकलक करीत होते. त्यांनीं नेसलेले शालूशेलेहि रेशमी सळसळ आणि भरजरी चमक दाखवीत होते. राजवाड्यांत जायचें असल्यामुळें आणि राणीसाहेबांच्या हातून हळदीकुंकू घ्यायचें असल्यामुळें त्या दिवशीं त्या नागर पुरंध्रींनीं आपल्या वेषभूषेंत कसलीहि कसूर ठेवली नव्हती.

राणीमहाल सुवासिनींनीं भरून गेला. सर्वजणींना यथायोग्य जागीं बसवण्यांत आलें. राणीनें सर्वांचें यथोचित स्वागत केलें. सर्वांच्या नजरा राणीच्या रूपावर रोखल्या गेल्या. पण सगळ्या जणींना राणीला पाहून आश्चर्य वाटलें, त्याबरोबरच विषादहि वाटला. 'हा काय प्रकार! इश्श' प्रत्येक स्त्री दुसरीच्या कानांत हळूच कुजबुजली. त्यांनीं कुजबुजावें असाच तो प्रकार होता.

राणी दवण्याच्या काडीसारखी सडपातळ होती, सुंदर होती आणि तेजस्वीहि होती. पण तिच्या अंगावरचें लुगडें जाडेंभरडेंच होतें. त्यावर नव्हते बुट्टे अन् नव्हती कलाकुसर. दागिन्यांच्या बाबतींतहि तीच तऱ्हा. हातांत काचेच्या बांगड्या अन् गळ्यांत मंगळसूत्र यापलीकडे फुटका मणिहि तिच्या अंगावर नव्हता. जमलेल्या सवाष्णींच्या समागमें आलेल्या त्यांच्या दासीबटकीसुद्धा खुद्द राणीपेक्षां अधिक सालंकृत आणि अधिक नटलेल्या होत्या. आणि राजाच्या पट्टराणीचें हें अवलक्षण! त्या बायकांना तें बरें वाटलें नाहीं. आपल्या साज-श्रृंगारापेक्षां राणीचा साजश्रृंगार शतपटींनीं मौल्यवान् हवा अशी त्यांची अपेक्षा होती. त्यामुळें त्यांची त्यांनाच लाज वाटली. समारंभानंतर घरीं परत जातांना सर्वांच्या मुखीं चर्चेचा तोच एकमेव विषय झाला.

सर्व सवाष्णी निघून गेल्यावर एका श्रीमंत सावकाराची बायको मुद्दाम मागें राहिली. तिची आणि राणीची जरा विशेष सलगी होती. ती राणीला म्हणाली.

" महाराज्ञी! बोलूं नये; पण धीर करून बोलतें. तुमचे यजमान एका मोठ्या राज्याचे स्वामी आहेत. तेव्हां तुम्हीहि पट्टराणीच्या

इतमामानंच राहायला हवं, हें तुमच्या कसं लक्षांत येत नाहीं ? तुमच्या अंगावर मंगळसूत्राव्यतिरिक्त कांहींहि असूं नये, ही काय चांगली गोष्ट आहे ? पहा एकदा तुमच्याकडे. तुम्हीं नेसलेला हा जाडाभरडा सुताडा ! माझ्या घरची मोलकरीण सुद्धा हा नेसायची नाहीं...तें कांहीं नाहीं. तुम्ही महाराजांच्याकडे हट्ट धरा. सुवर्णाच्या कोंदणांत नवलाख हिऱ्यांचे दागिने घडवून घ्या. मी तुम्हांला एक गुपित सांगतें. हट्ट धरल्याशिवाय पुरुषांच्याकडून बायकांना काहींच मिळत नसतं बरं ! ”

एवढें बोलून ती सावकारीणबाई निघून गेली. राणीच्या डोळ्यांतून दोन दुःखाश्रू ओघळले. एवढा वेळ तिनें धारण केलेला हसतमुखपणा उसना अन् नकली होता. आतां तो गळून पडला. उंची वस्त्रांची आणि बहुमूल्य अलंकारांची तिलाहि अतोनात हौस होती. पण राजाच्या वार्षिक खाजगी खर्चांत तिचीं वस्त्रभूषणें बसतच नव्हतीं, त्याला ती काय करणार ! तिनें दागिन्यांची गोष्ट काढली, कीं चक्रवेण राजा तिला एक घटका तत्त्वज्ञान ऐकवीत असे. त्याच्या बोलण्यापुढें तिला निरुत्तर व्हावें लागे. पण त्यामुळें तिच्या स्त्रीसुलभ आकांक्षा मात्र तिळभरसुद्धा कमी होत नसत. ती आंतल्या आंत झुरे आणि कष्टी होई.

चक्रवेण राजा हा अगदीं वेगळ्या जातीचा राजा होता. त्याच्या कल्पना इतर सर्व राजांहून भिन्न होत्या. इतरांच्या दृष्टीनें मूर्खपणाच्याहि होत्या. तो धर्मात्मा होता. प्रजेच्या पालनांत दक्ष होता. उद्योगी होता. आणि त्याचबरोबर ऐषआरामांच्या बाबतींत कमालीचा उदासीन होता. त्याचा भांडारखाना सोन्यारुप्याच्या

नाण्यांनीं खच्चून भरलेला असे. पण त्यांतलें एक नाणेंहि तो स्वतः-करितां वापरीत नसे. आपला खजिना हा आपला नसून ती प्रजेची ठेव आहे, त्यांतलें प्रत्येक नाणें प्रजेच्या हिताच्या कामीं खर्च झालें पाहिजे, या बाबतींत त्याचा कटाक्ष होता.

आपण राजे आहों, फार मोठ्या भूप्रदेशाचे धनी आहों, अनेक सामंत-सरदारांचे मालक आहों, तेव्हां आपण गादीवर लोळून खावें-प्यावें असें त्याला कधींच वाटलें नाहीं. शरीर – मग ते रंकाचें असो वा राजाचें असो-तें लोळण्यासाठी नाहीं. आळसाच्या जांभया देण्यासाठीं नाहीं अन् ऐतखाऊपणासाठींहि नाहीं, हें त्याच्या मनांत अगदीं ठाम बिंबलें होतें. देवानें हातपाय दिले आहेत ते हालवलेच पाहिजेत, बुद्धि दिली आहे तिचा उपयोग केलाच पहिजे, अशी त्याची धारणा होती.



राजा – राणी शेतांत

त्यामुळें आपल्या उदरनिर्वाहासाठी त्यानें विशिष्ट क्षेत्रफळाची शेतजमीन ठरवून घेतली होती. त्या भूमींत तो शेती करीत असे.

दिवसाचें राजदरबारांतलें काम आटोपलें, कीं राजाची स्वारी शेतांत दाखल व्हायची. राजा गेला, कीं पाठोपाठ राणीलाहि जावें लागे. आपल्याबरोबर तो तिलाहि शेतांत राबवून घेत असे. राणी नाजुक होती, कोमल होती; पण तिचे हातपाय शेतांत खपून घट्ट अन् खरबरीत झाले होते. गोऱ्यापान चेहऱ्यावर उन्हाची किंचित् सावळी छटा चढली होती. राजानें नांगर धरला, कीं तिला पाठीमागून ढेकळें फोडावीं लागत. त्यानें पेरलें, कीं तिला तणकाडी काढावी लागे. त्यानें कापलें, कीं तिला गोळा करावें लागे. त्यानें मळणी धरली, कीं तिला बैल हाकावे लागत. राजाचें हें कष्टी, श्रमी जीवन, लोक मुद्दाम येऊन पाहात आणि आश्चर्य करीत. त्या शेतांत जें पिके तें राजा–राणीचें हक्काचें अन्न ! स्वतः पिकवलेल्या तांदुळाचा भात पानावर पडला, कीं तो राणीला म्हणे.

" जेव सावकाशपणें. हें अन्नच नव्हे; तर अमृतहि आहे. पंचपक्वान्नांपेक्षांहि हें तुझ्या अंगीं अधिक लागेल."

आणि मग वाढलेल्या ताटाला नमस्कार करून त्यांतला ग्रास उचलतांना तो म्हणे, ' अन्नं ब्रह्मेति व्यजानात् ।'

त्याच शेतांत एका बाजूला तो कापूस पिकवी. त्या कापसाचें सूत काढी. त्यांतूनच त्याचीं राजवस्त्रें आणि राणीचीं पाटावें निघत. राणीचीं लुगडीं जाडीभरडीं असत, तीं याचमुळें. मागावरचें नवें वस्त्र नेसून पुढें आलेल्या राणीला तो म्हणे—

" हें वस्त्र तुझ्या–माझ्या श्रमांतून निर्माण झालें आहे. हें तुझ्या–माझ्या पवित्र भावनांनीं रंगलं आहे. या वेषांत तूं किती सुंदर

दिसतेस! तुझं हें पवित्र सौंदर्य पाहतांना माझा ऊर भरून येतो. वाटतं, स्वर्गांतल्या शंभर अप्सरा तुझ्यावरून ओंवाळून टाकाव्या."

राजाच्या या निरलस, निरामय आणि प्रयत्नशील जीवनानें त्याच्या प्रजेंत एक नवा आदर्श निर्माण झाला होता. आळसदेवाला नदींत बुडवून ते 'प्रयत्नदेवा'ला भजूं लागले होते. त्यामुळें त्याचें राज्य समृद्ध झालें होतें. दैन्य, दारिद्र्य देशांतरीं पळालें होतें. सगळे लोक सुखी होते. सहकार्यानें प्रगति करीत होते. साध्या राहाणीचें महत्त्व आणि त्यागपूर्ण जीवनांतला गोडवा जाणूं लागले होते आणि त्यामुळेंच सुसंस्कृत झाले होते.


त्यामुळें आणखी एक आश्चर्य झालें होतें. राजाचें धर्मचक्र अकुंठितपणें चालत होतें. या राजाला 'चक्रवेण' असें नांव पडलें होतें, तें पृथ्वीवर अकुंठित गतीनें संचार करणाऱ्या अदृश्य अशा त्याच्या शासनचक्रामुळेंच.

पण राणीला या गोष्टीची दखल नव्हती. ती राजा-राणींचें मोठेंपण हें त्यांच्या वैभवांत, सुखविलासांत आणि उंची वस्त्रालंकारांतच आहे असें समजत होती. आपल्याला शेतांत राबावें लागतें आणि इतकें करूनहि नटणें-थटणें कांहींच करतां येत नाहीं किंवा बहुमूल्य वस्त्राभूषणांनीं मिरवतां येत नाहीं, याबद्दल तिच्या जिवाला एक हृद्रोगच जडला होता. आणि आज तर हळदी-कुंकवाला आलेल्या एका श्रीमंत बाईनें तिच्या या भिकार लक्षणांचा जणूं उपहासच केला होता.

त्या रात्रीं ती राजाजवळ खूप रुसली-फुगली. मधून मधून डोळ्यांना पदर लावायलाहि तिनें कमी केलें नाहीं. राजानें तिची समजूत घालायचा खूप प्रयत्न केला, पण तिचें आपलें पालुपद एक.

"तें कांहीं नाहीं. मला दागिने हवेत. याउप्पर मी लंकेची पार्वती राहणार नाहीं. मी कोण्या रंकाची बायको नसून राजाची पट्टराणी आहें. अन् तें मी कधींहि विसरणार नाहीं."

त्यावर राजा कांहींच बोलला नाहीं. रात्रभर त्यानें खूप विचार केला. त्याच्या भांडारांत सोन्याच्या राशी होत्या, पण राणीच्या



राणीचा रुसवा

दागिन्यांसाठीं त्यातलें रतिभरसुद्धां सोनें वापरायचें नाहीं, हा त्याचा निर्धार कायम राहिला. त्यासाठीं या ना त्या रूपानें प्रजे-

वर कर बसवून जरूर तेवढें द्रव्य उभें करणें हा भागहि त्यानें निंद्य ठरविला, पण तरीहि आपल्या राणीच्या दागिन्यांची हौस भागविणें जरूर आहे, हें मात्र त्याच्या मनांत निश्चित झालें.

सकाळीं उठून त्यानें आपल्या प्रधानाला बोलावून घेतलें. राजा त्याला म्हणाला—

" प्रधानजी, लंकेची परिस्थिति काय आहे ? "
यावर प्रधान म्हणाला—

" महाराज हें काय विचारणं ? लंकेच्या तटाला सोन्याच्या विटा आहेत. आणखी काय सांगूं ? "

" मग प्रधानजी, आत्ताच्या आतां लंकेंत चला. दशमुखी रावणाला माझा आधीं नमस्कार आणि मग निरोप सांगा. म्हणाव चक्रवेण राजाला राणीसाठीं दागिने घडवायचे आहेत. त्यासाठीं तुझ्या भांडारांतून सव्वा मण सोनं हवं आहे. "

प्रधान लगेच निघाला आणि आधीं स्थलमार्गानें आणि मग जहाजांत बसून समुद्रमार्गानें लंकेंत पोंचला. दरबारांत जाऊन त्यानें रावणाची भेट घेतली. नम्रपणें आपल्या राजाचा निरोप रावणाला ऐकवला. रावणानें त्याला ' या ' म्हटलें नाहीं, कीं आसनहि दिलें नाहीं. निरोप ऐकतांच त्यानें प्रथम कपाळाला आठ्या घातल्या आणि मग उपहासानें हसून दरबारांतल्या सभासदांना म्हटलें,

" दरबारी मंडळी ! ऐकलांत हा निरोप ? असला मूर्ख राजा जगांत दुसरा कोणी असेल असं वाटतं तुम्हांला ? काय तर म्हणे,

सव्वा मण सोनं दे ! मी जसा कांहीं देणेकरीच लागतों याचा ... ए मूर्ख राजाच्या मूर्ख प्रधाना ! तुझ्या धन्याला म्हणावं या चौदा चौकड्यांच्या रावणाला दुसऱ्याकडून घ्यायचं फक्त माहीत आहे, द्यायचं माहीत नाहीं. देव, मानव, दैत्य, दानव या सर्वांच्याकडून ह्या लंकेचा सम्राट कर वसूल करतो. तो दुसऱ्या कोणाला करभार देत नाहीं. जा चालता हो माझ्या राज्यांतून. एकवार तुला क्षमा करतों. पुन्हां आलास तर याद राख !

प्रधानानें ऐकलें. आणि तो माघारीं फिरला. मग रावणानें पाठीमागून चक्रवेण राजाची खूप टवाळी उडवली. दहा तोंडांनीं तो मनसोक्त हंसला. दरबारी मंडळींनींहि त्याच्या हंसण्याला सात मजली साथ दिली. राजवाड्यांत त्या दिवशीं सगळीकडे तीच चर्चा ! तीच चेष्टा ! तोच हशा !

हंसली नाहीं ती मंदोदरी मात्र. ती रावणाची पट्टराणी. तिला रावणापेक्षांहि खूप शहाणपण होतें. तिला आपल्या नवऱ्याचें आणि जगांतल्या अन्य राजे–रजवाड्यांचेंहि बलाबल चांगलें माहीत होतें. प्रत्येक गोष्टीचे परिणाम आधीं तिच्या लक्षांत येत असत. त्यामुळें वेळोवेळीं ती आपल्या नवऱ्याला सावध करीत असे. रावण प्रत्येक वेळीं तिला धुडकावून लावी पण तिनें मात्र आपलें व्रत सोडलें नव्हतें. त्या दिवशींहि रात्रीं एकान्तांत ती रावणाला म्हणाली,

" महाराज ! आपण चक्रवेण राजाची टवाळी केलीत आणि त्याच्या प्रधानाला एखाद्या भणंग भिकाऱ्याप्रमाणं हाकलून दिलंत, हें बरं झालं नाहीं. ज्याचा तुम्हीं अपमान केलात, त्या चक्रवेण राजाचा प्रताप तुम्हांला ठाऊक नाहीं. तो धर्मात्मा आहे. "

'असूं दे ग, धर्मात्मा नाहींतर कर्मात्मा! तूं म्हणजे अगदीं हरणाच्या काळजाची आहेस बघ. तो केवढाहि मोठा असला तरी शेवटीं माणूसच ना.........मी माणसाची पर्वा करीत नाहीं. क्षुद्र घुंघुरटं अन् माणूस माझ्या वांट्याला दोन्ही सारखींच!"

"ठीक आहे महाराज! मी आतां कांहीं बोलत नाहीं. सकाळीं एक चमत्कार दाखवीन, तो पहावा."

"बरं, बरं! पाहीन मी तो चमत्कार. आतां तरी मला सुखानं झोप घेऊं दे."

रात्र संपली. दिवस उगवला. सूर्याचे किरण सर्वत्र फांकले. ती सुवर्णनगरी त्या सूर्यप्रकाशांत झळाळून उठली. मंदोदरी रावणाला घेऊन वाड्याच्या गच्चीवर गेली. सकाळीं कबुतरांना स्वहस्तें दाणे घालणें हा तिचा नित्य परिपाठ होता. आजहि तिनें गच्चीवर दाणे पेरले. भराभरा चहुंबाजूंनीं कबुतरें गच्चींत उतरलीं. तीं इकडे तिकडे न पाहतां पटापट दाणे टिपूं लागलीं. मग मंदोदरी रावणाला म्हणाली,

"महाराज! आतां गंमत दाखवतें हं" मग लगेच ती त्या पाखरांकडे वळून म्हणाली. "कबुतरांनो, एकहि दाणा टिपूं नका. तुम्हाला रावणमहाराजांची आण."

पण ती शपथ पाखरांच्या कानावर गेलीच नाहीं. तीं दाणे टिपीतच राहिलीं. तें पाहून रावण सात मजली हंसला. त्यानें मंदोदरीला म्हटलें—

"तूं तरी वेडीच आहेस. अग, पाखरं म्हणजे अज्ञानी जीव. रावण काय अन् महारावण काय! त्यांना सगळे सारखेच. खायला मिळाल्याशीं कारण...."

"ठीक आहे! पक्षी म्हणचे अज्ञानी जीव, हें तुम्हांला पटलं. आतां दुसरी एक गंमत पाहा." पुन्हां ती पाखरांकडे वळली आणि म्हणाली, "पाखरांनो, दाणे टिपूं नका. तुम्हाला चक्रवेण राजाची आण!"



कबूतरांना शपथ

आणि त्या सरशीं काय विचारतां! तीं पाखरें म्हणजे जणूं चित्रांतलीं पांखरें बनलीं. एकाएकीं त्यांचें दाणे टिपणें थांबलें. सगळीं स्तब्ध! फक्त एका कबुतरानें चोंच खालीं करून दाणा उचलला. पण त्यासरशीं त्याची मान तुटून खालीं पडली. मंदोदरी त्यावर रावणाला फिरून म्हणाली—

" आहे ना चमत्कार! मीं नुसती शपथ घातली आणि तेव्ह-ढ्यानंच हें अघटित घडलं. ज्या कबुतरानं दाणा टिपला, तें बहिरं होतं. त्याला शपथ ऐकूं गेली नाहीं. त्यामुळें चक्रवेण राजाच्या अदृश्य चक्रानं त्याला प्रायश्चित दिलं. असा आहे चक्रवेण राजाचा प्रभाव! पहा, अजून एकहि कबूतर चोंच उघडीत नाहीं. मान वाकवीत नाहीं. आतां मी पुनः एक गंमत करतें......
" पाखरांनो, तुम्हांला घातलेली शपथ सुटली. आतां खुशाल दाण्यांचा समाचार घ्या."

त्यासरशीं कबुतरें पुन्हां दाणे खाऊं लागलीं. रावणाला त्या गोष्टीचा खराच चमत्कार वाटला. कांहीं न बोलतां तो आपल्या कामाला निघून गेला.

त्यानंतर आणखी एक प्रकरण घडलें. रावणानें घालवून दिलेला प्रधान कांहीं परत गेला नव्हता. त्यानें समुद्राच्या पुळणींत मुक्काम ठोकला होता. त्यानेंहि तिथें एक गंमत केली. तो मोठा स्थापत्य-विशारद होता. त्यानेंहि ओली बारीक वाळू खूपशी एकत्रित केली आणि त्या वाळूची हुबेहूब लंका बनवली. तसाच तट, तसेच बुरूज, तशींच चारी दिशांचीं महाद्वारें, तसेच देवड्या — पहारे आणि तसेच नगारखाने ... अगदीं लंकेची हुबेहूब प्रतिमा!

रावण मंदोदरीनें दाखविलेल्या कबुतरांचा चमत्कार पाहून नुक-ताच दरबारांत आला होता आणि तेवढ्यांत चक्रवेण राजाचा हा प्रधान त्याच्यापुढें ' दत्त ' म्हणून उभा राहिला.

" महाराज, तुम्हीं मला काल घालवून दिलं खरं; पण मी जाऊं शकलों नाहीं. समुद्राच्या वाळवंटांत मीं एक गंमत केली आहे. तुम्ही जर पाहायला आलांत, तर मला मोठा आनंद वाटेल. "

त्या वेळीं मात्र प्रधानाला हुसकून लावण्याचा धीर रावणाला झाला नाहीं. तो हंसला नाहीं कीं चेष्टेखोरपणानें अद्वातद्वा कांहीं बोललाहि नाहीं. त्यानें प्रधानाची विनंती मुकाट्यानें मान्य केली. दरबारी मंडळींना बरोबर घेऊन तो समुद्रकिनारीं आला. प्रधानानें त्याला ती वाळूची नगरी दाखवून विचारलें—

" रावण महाराज ! या वाळूच्या स्थापत्याची ओळख पटते ? "

" वा ! न पटायला काय झालं ? ही तर माझ्या लंकेची प्रतिकृति आहे. "

" अगदीं हुबेहूब ? "

" हो तर ! अगदीं जशास तशी. "

" मग आतां एक गंमत पहा. मी या वाळूच्या नगरीचं पूर्वद्वार आणि दोन्ही बाजूचे बुरूज खालीं पाडतों. "

" म्हणजे काय होईल ? "

" आतां तुमच्या डोळ्यांनींच पहा ना ! हातच्या कांकणाला आरसे नकोत. "

प्रधानानें हातांतल्या काठीनें वाळूच्या नगरीचा तो पूर्व भाग ढोसला मात्र; तोंच काय सांगावें ! एकदम ' धडाड्धुम ' असा आवाज उठला. रावण दचकला. सगळेच दचकले. सर्वांनीं मागें वळून पाहिलें. खऱ्या लंकेचें पूर्वद्वार कोसळत होतें. तटबंदीचे

चिऱ्यामागून चिरे खालीं गडगडत होते. लंकेच्या वेशीला प्रचंड भगदाड पडलें होतें. 'अरे बापरे!' सर्वांनीं तोंडावर हात ठेवला. रावणाच्याहि छातीचे किल्लेकोट ढासळले. रावणहि भयचकित झाला. त्याची ती अवस्था पाहून चक्रवेण राजाचा प्रधान त्याला म्हणाला,

"लंकाधिपते! हें माझं सामर्थ्य नव्हे. हा आमच्या राज्याच्या धर्मचक्राचा प्रताप आहे. तें चक्र दिसत नाहीं, पण काम मात्र बिनचूक करतं. मीं मनांत आणलं, तर याच पद्धतीनं तुझी सगळी सुवर्णलंका एका घटकेंत जमिनीवर निजवूं शकेन. तूं तुझ्या सर्व शक्तीनिशी तिचं रक्षण कर आणि तें जमत नसेल, तर सव्वा मण सोनं देऊन माझी रवानगी कर."

त्यावर सर्व अमात्य आणि दरबारी मंडळी पोटीं भय बाळगून रावणाला म्हणाली—

"महाराज! नका हें संकट ओढवून घेऊं. लंका जमीनदोस्त झाली, तर राक्षसांचा आसरा मोडेल. सर्व प्रजाजन चक्रापत्तींत सांपडतील. सगळा हाहा:कार होईल. सगळंच उलटंच्या पालटं होऊन जाईल. सव्वा मण सोनं म्हणजे आपल्या वांट्याला कोपऱ्यांतला केर आहे. समोर दंड थोपटून लढायला येणारा शत्रु पुरवला; पण ही भुताटकीची आफत नको."

भोंवतालच्या मंडळींचें म्हणणें रावणालाहि पटलें. कारण तो काचाभूल झाला होता. समोरच्या संकटापुढें अगतिक झाला

होता. त्यानें प्रधानाला आपल्याबरोबर दरबारांत बोलावलें, त्याचा सन्मान केला आणि सव्वा मण सोनें पदरांत बांधून त्याची बोळवण केली. एकदां हें संकट लंकेच्या बाहेर जाऊं दे, असें त्याला वाटलें.

प्रधान तें सोन्याचें पिवळें लकाकतें ओझें घेऊन चक्रवेण राजाकडे आला. राजा-राणी दोघेहि एकत्र बसलेलीं होतीं. त्या सोन्याच्या विटा राजापुढें ठेवून प्रधानानें लवून नमस्कार केला. राजा त्याला म्हणाला,

"प्रधानजी! एकूण तुम्ही मोहीम यशस्वी करून आलां!"

"महाराज, हें सर्व आपल्या प्रभावामुळें घडलं. मी काय; एक यःकश्चित् माणूस!"

"रावणानं तुझी मागणी तावडतोब मान्य केली ना?"

"नाहीं महाराज! या जगांत चमत्काराशिवाय नमस्कार मिळत नाहीं. रावणानं मला पहिल्याप्रथम धुत्कारून लावलं. मग दाखवला त्याला आपल्या चक्राचा चमत्कार! लंकेचं पूर्वद्वार जेव्हां धडाडून कोसळलं, तेव्हां स्वारी वठणीवर आली."

आणि मग प्रधानानें लंकेंतली साद्यंत हकीगत राणीच्या देखत राजाला ऐकवली. राणीला मोठें आश्चर्य वाटलें. तिनें राजाला विचारलें,

"महाराज, हें चक्र कुठलं अन् कसलं? मला कांहींच कल्पना नाहीं. मी आजवर तें कधीं पाहिलं नाहीं. दशमुख रावणालाहि दातीं तृण धरायला लावणाऱ्या या दिव्य चक्राची हकीगत मला सांगा ना."

त्यावर राजा बोलला—

" 'देवि ! हें चक्र म्हणजे अव्यक्त आणि अदृश्य अशी एक शक्ति आहे. तूं अन् मी राजपदावर असूनहि आयतं खात नाहीं, आपण उद्योग आणि परिश्रम यांची कास धरली आहे. आपण आपलं अन्नवस्त्र स्वतः राबून निर्माण करतों. अंगेंप्राणें धरतीची सेवा करतों. भोगाकडे पाठ फिरवून त्यागमय जीवन जगतों. निष्काम भावनेनं प्रजेची सेवा करतों. प्रजेनं कराच्या रूपानें दिलेला पैसा आपण आपल्या चैनीसाठीं खर्च करीत नाहीं. स्वार्थी नजरेनं प्रजेच्या पैशाकडे पाहाणंसुध्दां पाप मानतों. प्रजेचं पुत्रवत् पालन हाच आपला धर्म. राज्यांत कोणीहि उपाशी राहणार नाहीं आणि कोणीहि आळशी राहणार नाहीं, हें पहाणं आपलं आद्य कर्तव्य समजतों. या वृत्तींतून एक शक्ति निर्माण झाली आहे. ही धर्मशक्ति आहे. ही शक्ति अव्यक्त चक्राच्या रूपानं आपल्या राज्यांत काम करते...पण देवि, मला या क्षणीं एक विलक्षण दुःख होत आहे."

"तें कसलं महाराज?"

"ती शक्ति, तें धर्मचक्र आज मीं माझ्या स्वार्थासाठीं वापरलं. तुझी दागिन्यांची हौस पुरवण्यासाठीं मी त्यांचा उपयोग केला. कुठलीहि शक्ति, कोणतंहि सामर्थ्य, व्यक्तिगत स्वार्थासाठीं वापरलं कीं, त्याची धार बोथट होते. त्याचं तेजहि क्षीण होतं...."

राजाच्या तोंडून हीं वाक्यें ऐकतां ऐकतां राणीचा ऊर भरून आला. तिला खरोखरच या गोष्टी माहीत नव्हत्या. आपला पति

केवढा थोर पुरुष आहे, हें तिला या प्रसंगीं जाणवलें. सर्व भोग-
समृद्धि पायाशीं लोळण घेत असतांहि राजा विरक्तासारखा वागतो
आणि त्याहीवर स्वतः राबतो-खपतो, हें तिला अवलक्षण वाटत
होतें, पण आतां तिचे डोळे उघडले. आतां तिच्या अंतरांत प्रकाश
पडला. ती काकुळती येऊन म्हणाली,

" महाराज ! माझी दागिन्यांची हौस फिटली. माणसाचा खरा
अलंकार कोणता, तें या क्षणीं मला कळलं, मी यापुढें पूर्वीसारखीच
राहीन आणि त्यांतच गौरव मानीन. मी आपणांजवळ हट्ट
धरला. भलत्या भरीस पडून रुसलें-रडलें आणि आपल्याला नको
तें करायला लावलं. मी त्याबद्दल आपली मनःपूर्वक क्षमा मागतें.
हें सव्वा मण सोनं आतां माझ्या वांट्याला मृत्तिकेसमान आहे. हें
जिथून आलं तिथं परत जाऊं दे. मला याचं दर्शनहि नको. "

राणीच्या या बोलण्यावर राजा प्रसन्न झाला. त्याला आपल्या
पट्टराणीचें कौतुक वाटलें. कांहीं झालें, तरी राणीचें मन हें संस्कारी
मन होतें. जें उमजायचें तें उमजल्यावर तें योग्य मार्गावर आलें.
त्याची साक्ष पटतांच राजाच्याहि मनाचें शतदळ उमललें. तो
हसून प्रधानाला म्हणाला,

" प्रधानजी, आतां आणखी एक कामगिरी तुमच्यावर आली. "

" आज्ञा महाराज ! "

" लंकेंत जाऊन हें सोनं रावणाला परत करून या. आतां याची

BVBK-0400044
किशोर २३